
# माणूस

१२ जानेवारी १९७४
पन्नास पैसे



कॉ. ज्योती बसू यांची मुलाखत

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

१२ जानेवारी १९७४

माणूस

वर्ष : तेरावे । अंक : तेहतीसावा

## सप्रेम नमस्कार....

### एका दिवसात चार प्रयोग !

७३ सालच्या अखेरच्या दिवशी आणि ७४ च्या प्रारंभ दिवशीच्या सीमारेषेवर 'गरुडझेप' या नाटकाच्या चार प्रयोगांची घोषणा वृत्तपत्रात वाचली. कुतुहल म्हणून तपशील पाहिला. प्रथमदर्शनी धाडसाची गोष्ट वाटली. पण ते कुतुहल ओसरल्यानंतर अनेक विचार मनात येऊन गेले.

एकाच नाटकाचे सलग चार प्रयोग करण्यामधून काय साधले जाणार? त्यामध्ये काही व्यावहारिक सोयी जरूर आहेत. विशेषत: एकाच दिवशी प्रयोगांची संख्या वाढणे, नेपथ्याच्या स्थलांतरासाठी होणाऱ्या खर्चात कपात होणे, कलाकारांना, निर्मात्याला, नाटककारांना धनलाभ होणे, जाहिरातीचा, थिएटर भाड्याचा खर्च कमी होणे वगैरे. हे सारे होईल, कदाचित आर्थिक फायद्याचे जाईल, पण कलाकारांच्या शारीरिक आणि मानसिक अवस्थांचे काय ? एका प्रयोगानंतर येणारा थकवा जातो न जातो तोच दुसरा प्रयोग सुरू होणार ! तिसऱ्या आणि चौथ्या प्रयोगाच्या वेळी शारीरिकदृष्ट्या कलाकाराची अवस्था काय असेल, याचा विचार कलाकारांनी आणि निर्मात्यांनी दोघांनीही करणे अगत्याचे आहे. एकाच

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

नाटकाचे किंवा भिन्न नाटकांचे प्रयोग पाठोपाठ केले तर नटांच्या प्रकृतीवर कोणते परिणाम होतात याची उदाहरणे ताजी आहेत. 'पप्पा सांगा कुणाचे ?' या नाटकाच्या बाबतही सुरुवातीला असेच घडले होते. एका दिवशी तीन प्रयोग केलेले होते. प्रयोगांच्या सातत्याने डॉ. लागूंवर झालेला परिणाम इतरांना खूप शिकवून गेलेला आहे. त्यांनीही तेव्हापासून काही निर्णय घेतले आहेत. अशी आणखीही काही उदाहरणे आहेत.

यावर असेही म्हटले जाईल की, प्रयोगात काम करणाऱ्या कलाकारांची जर इच्छा असेल तर काय हरकत आहे ? पण अशा अघोरी पद्धतीने प्रयोगांची संख्या वाढवून त्या कलाकाराचे कलाआयुष्य क्षीण करण्यात काय मतलब आहे ? एखादा कलाकार संथ गतीने प्रयोग करून दीर्घकाल रंगभूमीला लाभला तर हवा आहे. प्रयोगसंख्या आणि धनोत्पादन एवढाच विचार निर्मात्यांच्या बाजूंनी केला जातो. कलाकारानेही तेवढाच सीमित विचार करून अशा योजनांना मूर्त रूप दिले तर रंगभूमीच्या दृष्टीने ती एक चिंतनीय बाब आहे.

याचबरोबर आणखी एका गोष्टीचा विचार व्हायला हवा. प्रत्येक प्रयोगाला येणारा प्रेक्षक नवा–वेगळा–ताज्या दमाचा असतो. चार प्रयोगांच्या उपक्रमात कलाकार प्रत्येक प्रयोगागणिक श्रमून जाणार. चौथा प्रयोग पाहणाऱ्या प्रेक्षकाला कदाचित निर्जीव प्रयोग पाहायला मिळण्याची शक्यता आहे. याचा विचार निर्माते काय करतात ?

मोहन वाघ आणि त्यांची संस्था ही रंगभूमीच्या संदर्भात महत्त्वाचे कार्य करणारी संस्था आहे. त्या संस्थेविषयी जनमनात एक विशिष्ट गौरवाचे स्थान आहे. अशा संस्थेने हा निर्णय कशासाठी करावा ? केवळ 'स्टंट' किंवा इतरांहून काही निराळे करतो आहोत, हे दाखविण्यासाठी तर नाही ? ते वेगळेपण तुम्ही नाट्यनिवडीपासून प्रयोगरीतीपर्यंतच्या अनेक गोष्टीत दाखवू शकता ! त्यासाठी एकाच दिवशी चार प्रयोग करण्याची गरज काय ?

वि. भा. देशपांडे

# दर्डा विधानसभेत केव्हा येणार ?

स. न.

¤ दि. ३० रोजी आमदार मृणाल गोरे औरंगाबादला भेटल्या होत्या. जवाहरलाल दर्डांचा विषय निघाला होता.

त्यांनी दिलेली माहिती पुरेशी बोलकी आहे.

'माणूस'मध्ये दर्डांची कर्मकथा आल्यानंतर त्यांनी विधानसभेत त्यावर प्रश्न विचारले होते. एकूण तीन वेळा त्यांनी हा प्रयत्न केला. तिन्हीवेळा त्यांचा प्रयत्न असफल झाला.

आता मृणाल गोरे यांचा संशय पक्का झाला आहे, की मंत्र्यांनी आणि काँग्रेसवाल्यांनी दर्डांवर प्रश्नच विधान सभेत येऊ द्यायचा नाही असे ठरवले असावे.

कारण :–

एकदा प्रश्न पटावर होता. त्याचदिवशी कधी नव्हे ती 'पोळ्या' निमित्त विधानसभेला सुटी जाहीर करण्यात आली. 'मी काय करू, आमदारांनी तशी इच्छा प्रकट केली' असे ना. वसंतराव नाईक म्हणाले.

एकदा इतर प्रश्नांना अवास्तव वेळ देऊन, फालतू प्रश्नांना महत्त्व देऊन आधीच्या चर्चा खूप लांबवण्यात आल्या आणि दर्डांवरचा प्रश्न येण्याच्या वेळीच सभापतींनी वेळ संपल्याचे जाहीर केले.

एकदा चर्चा सुरू झाली. वेळ नेहमीप्रमाणेच थोडा होता. काँग्रेसच्या सदस्यांनी एकापाठोपाठ 'पॉईंट ऑफ ऑर्डर' उभे करायला सुरवात केली. इतके पॉइंटस ऑफ ऑर्डर की मृणाल गोरेंना बोलताच आले नाही. वेळ संपल्याचे जाहीर झाले.

दर्डाजी तडाख्यातून सुटत राहिले, सोडवले जात राहिले.

पुन्हा एकदा व्यवस्थित प्रयत्न करून जवाहरलालजींना 'पटावर' घेण्याची त्यांची अजूनहि इच्छा आहे.

कळावे,

जवाहरलाल दर्डांच्यावर असाच लोभ असू द्यावा. आपला

**निळू दामले**

---

## शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालय, पुणे ४११–००४

# वार्षिक निबंध स्पर्धा

**(वर्ष चवथे)**

विषय : 'समाजवादी समाजनिर्मितीच्या संदर्भात भारतातील डाव्या पक्षांचे मूल्यमापन.'

सूचना : १. निबंधाची कमाल शब्दमर्यादा २०००.

२. स्पर्धकाने आपले नाव, वय, संपूर्ण पत्ता व शिक्षणसंस्था अगर व्यवसाय यासंबंधीची माहिती निबंधासोबत पाठवावी.

३. निबंध तारीख १ मार्च पर्यंत खालील पत्त्यावर पाठवावा.- कार्यवाह, शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालय,
१२९ ब । २ एरंडवणे, पुणे ४११–००४

४. पहिल्या क्रमांकाच्या निबंधास पंचाहत्तर रुपयांचे व दुसऱ्या क्रमांकाच्या निबंधास पन्नास रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल. याबाबत परीक्षक मंडळाचा निर्णय अंतीम राहील.

**सुलभा ब्रह्मे, कार्यवाह**


सीमावाद
रस्त्यावर येतो
त्यावेळी मी
विचार करीत नाही !
सीमावाद
रस्त्यावर नसतो
त्यावेळी तो दिसतच
नाही. म्हणून
विचार करीत नाही !

जळगाव फैजपूर वार्ता

# ४६ मोटारी – ६ मंत्री

डॉ. राम आपटे

काही दिवसापूर्वी स्थानिक वर्तमानपत्रातून एक मोठी बातमी झळकली. 'प्रतिभा महिला बँकेच्या उद्घाटनानिमित्त ६ मंत्री येणार.'

दोन मुख्य मंत्री, एक केंद्रीय मंत्री व तीन मंत्री अशी बडी बडी ६ मंडळी एकदम जळगावला भेट देण्याचा हा पहिलाच प्रसंग म्हणून कुतूहल जागृत झाले. वाटले, प्रतिभा बँक ही काही साधी बाब नसावी. म्हणून थोडी चौकशी सुरू केली आणि एकापेक्षा एक सुरस बातम्या कानावर येऊ लागल्या.

बँकेच्या राष्ट्रीयीकरणानंतर यंदा एका पाठोपाठ एकेक बँका तोटयात गेल्याचे अहवाल प्रसिद्ध होऊ लागले आणि दिल्लीला हादरे बसू लागले. खुद्द इंदिराजी चिंतातूर झाल्याची बातमी महाराष्ट्राच्या इंदिरा ना. सौ. प्रतिभा सेखावत (पाटील) यांना कळली आणि त्यांनी सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ मीरा तडवी यांच्या सहकार्याने एक धाडसी योजना दिल्लीला रवाना केली. ही योजना पाहून बाई फारच खूष झाल्या. त्यांच्या साऱ्या आर्थिक समस्यांना सोपे उत्तर या योजनेत मिळाले.

रिझर्व बँकेचे गव्हर्नर व अर्थमंत्री यांनाही योजना एकदम पसंत पडली. आणि साऱ्यांनी ना. प्रतिभाताईंच्या विरोधाला न जुमानता या योजनेला प्रतिभाताईंचेच नाव देण्याचा निश्चय केला. आणि या योजनेतील पहिला टप्पा म्हणून 'प्रतिभा महिला सहकारी बँक' स्थापन करण्याचे ठरले.

बँकेच्या गोटातील महिला उत्साहाने कामाला लागल्या. तशात आणखी एकेक बातम्या येत गेल्या. कोणी म्हणाले की, आता धुणे भांडी करणाऱ्या बायकांना बरे दिवस येतील. तर कोणी म्हणू लागले की, आता बोहारणींनी सहकारी तत्त्वावर भांड्यांच्या दुकानांची साखळी योजना तयार केली आहे. काही महिलांनी औद्योगिक वसाहतीत जागा घेतल्याच्या बातम्याही आल्या. बँकेच्या एक प्रमुख कार्यकर्त्या तर म्हणू लागल्या की, येत्या ५ वर्षात महाराष्ट्रातील सारे कारखाने व लहानमोठे उद्योगधंदे

स्त्रियांच्या मालकीचे होतील व या धंद्यातून राष्ट्राच्या खजिन्यात प्रचंड भर पडणार आहे.

आम जनतेतील उत्साह पाहून कार्यकर्त्यांना जोम आला आणि त्यांनी उद्घाटनाचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात साजरा करण्याचे ठरविले. आमंत्रणे रवाना झाली. श्री. यशवंतराव चव्हाणांना बाईंनी दिल्लीहून जाण्याचे फर्मान काढले. गोव्याच्या मुख्य मंत्री सौ. काकोडकर यांनाही या एका महिलेच्या योजनेबद्दल कुतूहल वाटत होते. त्यांनीही येण्याची इच्छा प्रदर्शित केली.

वसंतराव नाईक, नामदार मोहिते व मधुकरराव चौधरी ही तर घरचीच माणसे.

या समारंभाला जोडून आणखी समारंभ आखले गेले. श्री. मधुकरराव चौधरी आपल्या वडिलांचा श्राद्ध दिन प्रतिवर्षी मोठ्या प्रमाणात साजरा करतात. गतवर्षी राज्यपाल अली यावर जंग आले होते. यंदा दिल्लीहून साहेब यायचे ठरले. आता यशवंतराव हे मधुकररावांच्या वडिलांच्या श्राद्ध दिनासाठी आले कीं प्रतिभा बँकेच्या समारंभासाठी याबाबत मधुकर गट व प्रतिभा गट यात वाद आहेत.

या दोन्ही समारंभाना जोडून न्हावी या गावी साखर कारखान्याचा पायाभरणी समारंभही ठरविण्यात आला.

इकडे विरोधी पक्षांनी निदर्शनाचा घाट घातला. साधी निदर्शने व्हावीत का तिखट व्हावीत यात त्यांच्यात मतभेद होतेच.

शनिवार सकाळ उजाडली. जळगावला मोटारींची धावपळ सुरू झाली. साऱ्या गाड्या विमानतळाच्या दिशेने धावू लागल्या. नेरी नाक्यावर विरोधी लोकांनी बराच जमाव जमवला.

विमानतळावर स्वागतासाठी मधुकरराव, प्रतिभाताई कॉंग्रेसची बडीबडी मंडळी, प्रतिभा बँकेच्या कार्यकर्त्या हारतुरे घेऊन सज्ज. विमान थोडे उशिराच आले— विमान येताच सारे चेहरे उजळले—

यशवंतराव व सौ. शशिकला काकोडकर विमानातून उतरल्या, हारतुरे, पोलीस सलामी आदि कार्यक्रम उरकून मंडळी खिरोदयाकडे निघाली. ४६ मोटारींचा ताफा चालू लागला. जळगावच्या नेरी नाक्यावर मोठ्या जमावाने जोरदार निदर्शने केली. परंतु काहीही गडबड न होता. नशैराबाद या गावीही जोरदार निदर्शने झाली. भुसावळला विरोधी जनसमुदाय खूपच मोठा होता. आरडा ओरडा खूप झाला. किरकोळ दगडफेकही झाली.

ताफा सुरक्षित पुढे गेला. परंतु पाहुणे मंडळींना अंदाज येऊ लागला. खिरोदा येथे श्राद्ध दिनाचा समारंभ लवकर उरकण्यात आला व मंडळी न्हावी या गावाकडे साखर कारखान्याचे समारंभासाठी निघाली. वाटेत फैजपूर या गावी निदर्शक मोठ्या संख्येने जमले होते. वातावरण तापत होते. ताफा जवळ आला तसा जनसमुदाय तापला आणि अचानक दगडफेकीलाच सुरवात

झाली आणि दगडफेक – लाठीमार – गोळीबार ही साखळी पूर्ण झाली. परिणाम–गोळीबारात ७ जखमी, किरकोळ जखमी अनेक

फैजपूर हे गाव म्हणजे मधुकररावांचा बालेकिल्ला. फैजपूर काँग्रेसमुळे इतिहासप्रसिद्ध. तिथे हा प्रकार म्हणजे मधुकररावांची सारी प्रतिष्ठाच धुळीला मिळाली.

जमाव काबूत येत नाही हे पाहून सर्व समारंभ रद्द करावा असे वाटू लागले. चर्चा, खल होऊन, समारंभ रद्द करून यशवंतरावांनी सरळ अकोला येथे जावे व तेथे विमान पाठवून द्यावे असे ठरले. गावाला आड वळसा घालून अनेक मोटारी निघून गेल्या.

फैजपूर गोळीबाराची बातमी वाऱ्यासारखी पसरली. न्हावी गावी समारंभाचे जागी दंगल पसरली. समारंभ उधळला गेला. जाळपोळ झाली. साऱ्या खानदेशभर बातमी २ तासात पसरली.

खुद्द जळगावला मंडळी बँकेच्या समारंभासाठी ४॥ ला येणार होती. फैजपूर गोळीबाराची बातमी पसरताच जळगाव तापले. दुकाने बंद झाली. आणि बँकेच्या समारंभाचे स्थानी लोक जमले आणि समारंभ रद्द करण्याची मागणी करू लागले. बँकेच्या कार्यकर्त्या महिला त्याला तयार नव्हत्या. त्या पोलिसांनाच दोष देऊ लागल्या. जमाव वाढत चालला व मंडपाचे रोखाने चालू लागला. पोलिसांनी साखळी केली. जमाव तेथेच बसून समारंभ रद्द करण्याची मागणी करू लागला. कार्यकर्त्या महिला, ताईंची ऑर्डर नाही म्हणून हट्टाला पेटल्या. तेवढ्यात एक पोलीस अधिकारी आले व त्यांनी समारंभ रद्द करण्याचा वरून आदेश आल्याचे जाहीर केले. जमाव हळू हळू पांगू लागला. एक अनवस्था प्रसंग टळला.

महागाईने त्रस्त झालेल्या लोकांना एकदम सहा मंत्री येतात हे पाहून चीड आली, आणि ठिणगी पडली.

मागे फैजपूर काँग्रेसने देशाला नवी दिशा दिली. आता फैजपूर गोळीबार कोणती दिशा देणार ! ● ● ●

---


# एका पराभवाची कहाणी

ले : ब्रिगेडियर जे. पी. दळवी । अनुवाद : अनंत भावे

मूल्य : पंधरा रुपये । राजहंस प्रकाशन


---

टॉलस्टॉय

एक

माणूस

पहा

माणूस

चित्र, वार्ता

१५ जानेवारी

अंक

# बसूंबरोबर एक तास

## माणूस प्रतिनिधी

रशिया-चीन बवनावानंतर भारतीय कम्युनिस्ट पक्षाची शकले उडाली. कॉ. डांगे आणि त्यांचे अनुयायी ह्यानी उघड उघड रशियानुकूल भूमिका घेतली. उजवे कम्युनिस्ट म्हणून ते ओळखले जाऊ लागले. १९६२ च्या चीन-विरोधी संघर्षानंतर आणि विशेपत: इंदिरा गांधींनी मोरारजी, स. का. पाटील, अतुल्य घोष, निजलिंगप्पा आदी 'सिंडेकेट'ला काँग्रेसमधून डच्चू दिल्यानंतर, हा डांगेवादी कम्युनिस्ट पक्ष सत्तारूढ काँग्रेस पक्षाच्या जवळ जाऊ लागला. भारताची धोरणेही जास्त जास्त रशियानुकूल बनू लागली. साहजिकच सत्तारूढ काँग्रेस आणि डांगेवादी भारतीय कम्युनिस्ट पक्ष ह्यांच्यातली मैत्रीही वाढत गेली. (अपवाद अर्थातच महाराष्ट्र !) आज ह्या दोन पक्षातली मैत्री आणि त्यांचे सहकार्य ह्यात एवढी वाढ झाली आहे की, भारतीय पातळीवर हे दोन पक्ष एकच वाटावेत ! एवढे असले तरी एक गोष्ट मात्र निश्चित की, ह्या मैत्रीतून, कम्युनिझम शासनात येणार नाही एवढी खबरदारी शासनाने घेतली आहे. जवळ करूनही कम्युनिस्टांना दूर ठेवण्याची करामत इंदिराजींना साधली आहे ह्यात वाद नाही ! उलट जो कडवा डावा विरोध किंवा खास 'कम्युनिस्ट विरोध' मध्यवर्ती शासनाला व सत्तारूढ पक्षाला व्हायला हवा तो ह्या कम्युनिस्ट पक्षा (उजवे) कडून होत नाही.

ह्या पार्श्वभूमीवर खऱ्या अर्थाने कम्युनिस्ट पक्ष जो आज ह्या देशात अस्तित्वात आहे तो डाव्या (मार्क्सवादी) कम्युनिस्ट पक्षाच्या स्वरुपात आहे हे मान्य करायला हरकत नाही. रशिया-चीन बेबनावाच्या वेळीच हा पक्ष अस्तित्वात आला. आणि चीनवादी संघटना म्हणून १९६२ च्या युद्धात व नंतर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या अनेक नेत्यांना मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांनी तुरुंगात टाकले. तरी देखील केरळ व बंगाल ह्या दोन राज्यात ह्या पक्षाने १९६७ मध्ये मोठी आघाडी मिळवून इतरांबरोबर सरकारे स्थापली. बंगालमध्ये १९७१ साली, देशभर

'इंदिरा लाट' पसरली असतानाही, मार्क्सवाद्यांनी सर्वात जास्त जागा जिंकून काँग्रेसला सत्तावंचित केले होते. आजही ह्या पक्षाचा कार्यक्रम जहाल आहे. खुद्द मुंबईत त्यांच्या 'सीटू' ह्या कामगार संघटनेचा जोर आज मोठ्या प्रमाणात वाढला आहे. बंगाल व केरळ इथे तर त्यांचा आवाज मोठा आहेच. १९७१ च्या निवडणुकात, स्वतःच्या जोरावर त्यांनी उजव्या कम्युनिस्टां-इतक्या (त्यांना काँग्रेसचा पाठिंबा होता!) जागा पटकावल्या होत्या (लोकसभेत) हे इथे लक्षात घेतले पाहिजे.

खऱ्या अर्थाने 'कम्युनिस्ट' म्हणून वावरणाऱ्या ह्या पक्षाचे एक अध्वर्यू बंगालचे माजी उपमुख्यमंत्री कॉ. ज्योती बसू हे परवा मुंबईत होते. सहजी बातमी मिळाली म्हणून मी संपर्क साधला. श्रीमती अहिल्याबाई रांगणे-करांच्या घरी जवळ जवळ तासभर कॉ. बसू, भेदक नजरेने बघत, शब्दांच्या जडजंबाळात न अडखळता, मोकळ्या मनाने, देशाच्या सद्य:स्थितीवर, त्यांच्या पक्षाच्या धोरणावर बोलत होते.

१९६९ किंवा १९७१ पूर्वीचा काळ आपण इथे फारसा विचारात घेण्याची आवश्यकता नाही असे मला वाटते. १९६९ मध्ये काँग्रेस दुभंगली. १९७१ मध्ये इंदिराजींची काँग्रेस प्रचंड बहुमत मिळवून निवडून आली. ह्या वेळी एक नवीन बदल घडून येत आहे, देशाच्या दृष्टीने तो हितकारक ठरेल असले आशावाद तेव्हा बोलून दाखवले जात होते. त्याच वेळी निवडणूक प्रचारात व अन्य माध्यमातून हा आशावाद फुकट आहे असे आम्ही जनतेला सांगितले होते. बदल काँग्रेसमध्ये जरूर घडून येत होता, पण तो केवळ सत्ताधारी व्यक्तीं-मध्ये बदल घडून येत होता. मोरारजी, पाटील, घोष जाऊन इंदिरा गांधी येत होत्या एवढाच तो बदल होता. काँग्रेसची मूलभूत जमीनदारी बैठक कायमच होती. त्यामुळेच त्या वेळच्या बदलामुळे परिस्थितीत काही फरक पडणार नाही, जनतेचा आर्थिक–सामा-जिक कुठलाही फायदा ह्या बदलामुळे होणार नाही असे आम्ही तेव्हा सांगत होतो. आमचे म्हणणे आज खरे ठरत आहे.

: १९७१ च्या सनसनाटी विजया-नंतर गेल्या दोन वर्षात परिस्थिती अत्यंत विकोपाला गेली आहे. काळा बाजार, साठेबाजी ह्यांनी परिसीमा गाठली आहे. अन्नधान्यांचे भाव बेसुमार वाढले आहेत. टंचाईने अनेक जीव होरपळून निघताहेत. उत्पादन घटले आहे, वेतन मूल्य घटले आहे. भांडवल-दार, जमीनदारांचे फायदे मात्र ह्या काळात वाढले आहेत. त्यांना वेळोवेळी उत्पादन मूल्य वाढले किंवा कर वाढले म्हणून जीवनावश्यक वस्तूंची भाववाढ करायला सरकारने परवानगी दिली. ह्या प्रकारे भांडवलदार, जमीनदार वर्गाचे फायदे सुरक्षित ठेवून (किंवा ते वाढवून देऊनही) उत्पादनमूल्य वाढीचा किंवा करांचा बोजा मात्र सामान्य जनतेवर लादला. साखर आणि

कापड ही ह्या घडीची ह्या संदर्भातली बोलकी उदाहरणे. साखरेचे उत्पादन गेली तीन वर्षे सातत्याने वाढत आहे. पण तिच्या वाटपात सुसूत्रता नाही, किमतीवर तावा नाही. उत्पादन वाढत असताना साखरेच्या किमती सतत वाढत आहेत. हीच गत कापडाची आहे. कापडाचे उत्पादन गेली काही वर्षे सातत्याने वाढत आहे. मुंबईतल्या कापड गिरण्यांनी गेल्या वर्षात २९–३० कोटींच्या घरात निव्वळ फायदा मिळविला आहे. शेअर्सवर देण्यात आलेल्या डिव्हिडंड्सनी ह्या फायदा स्पष्ट स्वरुपात दाखवून दिला आहे. पण कामगारांना याचा फायदा काय मिळाला आहे? सर्वसामान्य ग्राहकांना त्याचा फायदा काय झाला आहे? कामगारांना पगारवाढ द्यायला मालक तयार नाहीत. बोनस, नियमात कमीत कमी बसेल तेवढाच देणार. मार्केटमधून गरिबांचे जाडेभरडे कापडच नाहीसे झाले आहे. कारण, कागदोपत्री नियम असून देखील, अशा कापडाचे उत्पादन गिरण्या काढीतच नाहीत. बाकीच्या कापडाच्या किमती सरकारी मान्यतेखाली सारख्या वाढतच राहतात...

: अशी कितीतरी उदाहरणे दाखवून देता येतील. त्यामुळे आज देशभर परिस्थिती बिकट आहे. परिस्थितीच्या ह्या झंझावातामागे, काँग्रेसची मूलतः असलेली भांडवलशाही बैठक हेच मुख्य कारण आहे. काँग्रेस गेली कित्येक वर्षे (विशेषतः आवडी अधिवेशनानंतर) समाजवादाच्या गप्पा मारीत आहे. इंदिराजी डावे कार्यक्रम बोलून दाखवीत आहेत. पण नुसत्या अशा गप्पांनी किंवा तनखे बंद करणे, काही बँकांचे दिखाऊ राष्ट्रीयीकरण करणे किंवा केवळ रशियाबरोबर मैत्रीचे तह करणे म्हणजे समाजवाद नाही. ह्या मलमपट्ट्यांनी ह्या देशात समाजवाद येऊ शकणार नाही. पण जोपर्यंत, काँग्रेसच्या नाड्या जमीनदारांच्या, साराभाई – बिर्ला सारख्या भांडवलशहांच्या हातात आहेत, साखर कारखान्यांचे अधिपती जोपर्यंत काँग्रेसचेही अधिपती आहेत, तोपर्यंत काँग्रेसचा मूलभूत गाभा बदलूच शकत नाही. इंदिराजींच्या बड्या बड्या घोषणांनी 'गरिबी हटाव'च्या पोकळ नाऱ्यांनी किंवा त्यांच्या रशियाबरोबरच्या जवळकींनी त्या साम्यवादी बनतील हे संभवत नाही, नाही, ते अशक्य आहे! त्यामुळेच काँग्रेसच्या गप्पा, घोषणा काही असल्या तरी इथल्या पुंजीपतींच्या, जमीनदारांच्या हिताआड येतील अशी धोरणे ती अंमलात आणू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. आजच्या ठिकठिकाणच्या आंदोलनांच्या मुळाशी ही वस्तुस्थिती आहे.

: ह्या आंदोलनांना जनतेचा पाठिंबा देखील अतिशय उत्स्फूर्त आहे. आजच्या महागाईने, टंचाईने ग्रासलेल्या जनतेचे हे सरकारविरोधी आंदोलन आहे. 'बंद-संप'चे हत्यार त्यामुळेच सर्वत्र उपसले गेलेले दिसत आहे. मी आता सर्वत्र हिंडलो. डाव्या पक्षांचा जोर जिथे जास्त आहे तिथे हे सरकारविरोधी आंदोलन तर दिसलेच पण गुजराथ,

उ. प्रदेश, महाराष्ट्र वगैरे प्रदेश, की जिथे डावे पक्ष नगण्य आहेत, तिथे देखील आज संपांना, बंदना ऊत आला आहे. ह्याचे एकमेव कारण म्हणजे जनमानसात आज काँग्रेसविरोधी भिनलेली आत्यंतिक चीड! जनतेच्या या प्रक्षोभाला वळण लावून, भारतीय पातळीवर एकसूत्री कृतीची आज आवश्यकता आहे. डावी लोकशाही आघाडी हेच ह्या आवश्यकतेचे आज उत्तर आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट व समाजवादी ह्या दृष्टीने आज जवळ आले आहेत. इतरही डाव्या पक्षांनी एकत्रित आले पाहिजे. त्या प्रयत्नातून काँग्रेसला पर्यायी अशी परिणामकारक डावी आघाडी उभी रहाणे हे आजच्या घडीचे निकडीचे काम आहे.. ते आम्ही हलके हलके करू ह्याची मला खात्री आहे... 'ह्या आघाडीत, माझे मित्र डांगे आणि त्यांच्या पक्षाला अर्थातच स्थान नाही. जोपर्यंत ही मंडळी काँग्रेसमधून अलग होत नाहीत तोपर्यंत ह्या डाव्या आघाडीत त्यांना येता येणार नाही. काँग्रेसशी मिळवून घ्यायचे की त्यांच्या विरुद्ध मूले कुठार अशी आघाडी उघडायची ह्यावरच मूळ भारतीय कम्युनिस्ट पक्षात वादंग होते. त्यातूनच आम्ही अलग झालो. आज डांगे आणि त्यांचा पक्ष जवळ जवळ काँग्रेसवासी झाला आहे. इंदिरा गांधींनी आपल्या एका भाषणात सांगितले होते, '...by aligning with CPI (Dange Group), I am keeping the real Communism Out.' (डांगेवादी कम्युनिस्टांशी सहकार्य करून मी खऱ्या कम्युनिझमला दूर ठेवीत आहे.) बाईंचे उद्गार किती सार्थ होते ह्याची प्रचिती आज येत आहे...पण आज जनता पेटून उठली आहे. काँग्रेसच्या आश्वासनांचा बोजवारा तिला कळून चुकला आहे. अशा वेळी डाव्या आघाडीच्या पर्यायाला ती डोळसपणे उचलून धरील ह्याची मला खात्री आहे...

: आघाडीचे राजकारण १९६७साली पार फसले हे मान्य करूनही मी वरील स्टेटमेंट करीत आहे. १९६७ साली काँग्रेसविरोधी पक्षांना सर्वत्रच अनपेक्षित असे घवघवीत यश मिळाले. त्या वेळचे जनतेचे मत मात्र ह्या पक्षांना होते असे नाही, तर ते काँग्रेसविरोधी नोंदवले गेलेले मत होते एवढेच! ह्या अनपेक्षित निगेटिव्ह मतदानानंतर, निवडून आलेल्या विरोधी सभासदांच्या आघाड्या बांधल्या गेल्या, काही जुजबी कार्यक्रम आखले गेले आणि काँग्रेसेतर सरकारे अस्तित्त्वात आली. परस्परातला अविश्वास, आयाराम-गयारामचे वर्चस्व आणि आपसातली भांडणे ह्यातून ही सरकारे अपेशी ठरली. ह्या अनुभवातून विरोधी पक्षांना धडा मिळाला. मतदारही शहाणे झाले. इथून पुढे होणारे मतदान केवळ 'काँग्रेस विरोध' अशा नकारार्थी भूमिकेतून होणार नाही, तर परिणामकारक पर्याय शोधण्याच्या डोळस भूमिकेतून होईल. काँग्रेसविरोधी सर्वंकष वातावरण देशभर निर्माण होत असताना म्हणूनच अशा परिणामकारक डाव्या आघाडीला फार मोठा पाठिंबा

मिळू शकेल असे मला वाटते. नव्हे, प. बंगालमध्ये तसे घडलेही आहे. १९६७ चे सरकार कोसळल्यानंतर १९६९ साली पुन्हा कांग्रेसेतर पक्षांना मताधिक्य मिळाले. १९७१ साली देशभर कांग्रेसला सनसनाटी विजय मिळत असताना, माझ्या पक्षाने बंगाल विधान सभेत सर्वाधिक जागा मिळविल्या. इंदिरा हवा असतानाही झालेले हे मतदान डोळस नव्हते का ? पुढे बांगला कांग्रेसचे नेते व माझे मुख्य मंत्री अजय मुखर्जींनी राजिनामा दिल्यानंतर (त्यांना अक्षरश: विकत घेतले गेले !) १९७२ ला निवडणुकी झाल्या. मार्क्सवाद्यांचे खून पडत होते. सर्वत्र मिलिटरीच्या गाड्या ठेवून, दहशतीच्या अंमलात ह्या निवडणुकी काँग्रेसने घडवून आणल्या. लोकशाही तंत्राने काँग्रेसला पराभूत केले—१९७१ साली— एवढाच आमचा गुन्हा होता. त्याचे असे उट्टे १९७२ साली कांग्रेसने काढले. चिलीत ॲलेन्दे सरकार उलथून लावताना तिथे भांडवलदारांच्या संगनमताने जे घडले त्याचीच बंगालमधली काँग्रेसने घेतलेली ही रंगीत तालीम होती ! त्याच पद्धतीने आम्हाला मते देऊन व्यक्त केलेला कांग्रेस विरोध कांग्रेसने दडपून टाकला !!...

: थोडं विषयांतर इथे झाले. पण आघाड्यांच्या प्रश्नावर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची मते तरी तुम्हाला कळली. आपण पुन्हा मूलभूत प्रश्नाकडे वळू. खराखुरा समाजवाद आणायचा असेल तर भूसुधारणाकडे (Land reforms) प्रथम वळले पाहिजे. किंमती रोखणे, धान्य उपलब्ध करून देणे, काळाबाजार, चोरटी आयात रोखणे वगैरे गोष्टी शासनाला शक्य होत नाहीत. त्या इतर अनेक बाबीवर, आंतरराष्ट्रीय घडामोडीवर अवलंबून असतात असे शासन सांगते. Land reforms तरी अशा कुठल्या गोष्टीवर अवलंबून नसते ना ? मग ते शासन का अवलंबीत नाही ? प्रत्यक्ष कसेल त्याची जमीन ह्या तत्त्वानुसार जमिनीची फेर आखणी शासन का करीत नाही ? हे केले तर मक्तेदारी, साठेबाजी वगैरे अनेक गोष्टींना आळा बसेल. काळाबाजार, भाववाढ ह्यांच्यावर नियंत्रण ठेवता येईल. पण कांग्रेसला हे नको आहे. कारण त्यामुळे कांग्रेस व कांग्रेस सरकारमध्ये अधिकारपदे भूषविणाऱ्या अनेक व्यक्ती दुखावल्या जायची शक्यता आहे. आज जेमतेम ५% लोकांच्या हातात जवळ जवळ ४१% जमीन एकवटली आहे हे इथे लक्षात घेतले पाहिजे.

: दुसरी आम्हाला हवी असलेली मूलभूत सुधारणा म्हणजे, सर्व उद्योगधंद्यांचे, व्यापाराचे राष्ट्रियीकरण. आज राष्ट्रियीकरण झालेले किंवा सार्वजनिक क्षेत्राखाली सुरू असलेले उद्योगधंदे तोटयात चालतात हे मान्य करूनही मी ही सर्वंकश राष्ट्रियीकरणाची मागणी करीत आहे. ह्यात मग शासन विरुद्ध जनता एवढाच झगडा राहील. भांडवलदार हा वर्ग तरी मधून निघून जाईल. ह्या वर्गच दूर झाला की, त्याची देखील

सार्वजनिक क्षेत्रावर असलेली पकड ढिली करता येईल. सार्वजनिक उद्योग-धंदे अधिक प्रजाभिमुख करता येतील. व त्यातून उद्या त्या धंद्यांचे व राष्ट्राचे भले साधता येईल. सरकारी नादान-पणामुळे आज राष्ट्रीकृत उद्योग तोटयात चालत असूनही आम्ही ही मागणी करतो त्याचे कारण हे आहे...

ह्या ठिकाणी आमच्या बोलण्याचा ओघ मी देशातल्या औद्योगिक अशांतते-कडे वळवला. 'देशातल्या कामगारांची, त्यांना मिळणाऱ्या वेतनाच्या, सुवि-धांच्या तुलनेत उत्पादनक्षमता अजिबात कमी नाही, किंबहुना अनेक प्रगत राष्ट्रांच्या तोडीची आहे–' असे ठामपणे सांगून कॉ. बसू पुढे म्हणाले, 'जर्मनी, जपान इथल्या कामगारांबरोबर इथल्या कामगारांची तुलना करून, इथल्या कामगारांना कामच करायला नको, नुसत्या पगारवाढीच हव्यात असे म्हण-ण्याची फॅशनच ह्या देशात होऊन बसली आहे. पण त्याला मिळणारा पगार, मिळणाऱ्या सुविधा, उत्पादनक्षमते-साठी आवश्यक असणाऱ्या खाद्यान्नांचा कस ह्या गोष्टींची मात्र इथल्या व जर्मनी-जपानमधल्या तफावतीची दखल कोणी घेत नाही. मी तर असे म्हणेन की ज्या निकृष्ट प्रतीचे अन्न तो खातो, ज्या अस्वच्छ, घाणेरड्या वातावरणात तो जगतो-वाढतो, त्या मानाने तो देत असलेले उत्पादन वरील देशांपेक्षाही काकणभर अधिकच आहे....आज देश-भर कामगारांच्या संपांची, बंदची लाट उसळली आहे. त्यांना खायला-ल्यायला मिळत नाही. आहे त्या पगारात त्यांचे भागत नाही. म्हणून निर्वाणीचे अस्त्र ते उपशीत आहेत. आणि अशावेळी, इंदिरा गांधी मात्र त्यांनाच उपदेश करीत आहेत की स्वेच्छया संप-बंद वगैरेंचा त्याग करा! माझे म्हणणे वेगळे आहे. तुम्ही कंपनीच्या चालकांना, मालकांना का नाही विचारीत की तुझ्या कंपनीत संप होतोच का? संप होतील अशी परिस्थिती तुझ्या कारखान्यात निर्माण होतेच का? माझा तर असा आरोप आहे की, मालकांच्या कामगार विरोधी धोरणांमुळे आणि शासनाच्या अशा धोरणांना असलेल्या पाठिंब्यामुळेच संप, बंद घडून येतात. संप, बंदची जबाब-दारी म्हणूनच कामगारांपेक्षा चालकां-वर, मालकांवर जास्त आहे. संपामुळे राष्ट्रीय उत्पादन घटते हे मान्य, पण त्याचा जाब कामगारांना नव्हे, माल-कांना विचारला पाहिजे! उत्पादनात घट, त्यातून टंचाई, त्यातून महागाई व चलन फुगवटा (आज रुपयाचे मूल्य जेमतेम ३० पैसे आहे!) ह्या दुष्ट-चक्राच्या पापाचे धनी भांडवलदार, जमीनदार आहेत! शिक्षा त्यांना व्हायला पाहिजे त्यांच्या ह्या राष्ट्रीय गुन्हेगारीबद्दल. कामगारांना नाही!

: शासनही अशा कामगार विरोधी राष्ट्रीय गुन्हेगारीला हातभार लावते. अनेक तटे शासन टाळू शकते. खंबीर उपाययोजनांनी मालकांना वठणीवर आणून संप, बंद, टाळेबंदी व त्यातून येणारी उत्पादन घट थांबवू शकते. पण शासनालाच हे करायचे नाही. फार

काय पण खुद्द शासनाच्या उद्योगातून देखील शासन अशा निरर्थक संपांना वाव देते. ताजे उदाहरण घ्यायचे तर रेल्वेच्या लोको कर्मचाऱ्यांचे. नेमलेल्या समितीच्या शिफारशींविरुद्ध त्यांना चौदा तासांची पाळी शासनाने चालू केली. ऑगस्टमध्ये त्या कर्मचाऱ्यांनी संप घडवून आणून रेल्वे बंद केली तेव्हा करार घडून आला, त्यांचे कामाचे तास कमी करण्याचे ठरले. पण ह्या कराराची अंमलबजावणी झाली नाही. रेल्वे कर्मचाऱ्यांना पुन्हा उलट उद्धट उत्तरे ऐकायला मिळाली व त्यांचा पुन्हा संप झाला. हा संप कुणी घडवून आणला? कर्मचाऱ्यांनी नाही तर शासनाने!

: मुंबईच्या गिरणी कामगारांच्या लढ्याचा प्रश्न असाच आहे. गेल्या अनेक वर्षांच्या, अलिकडच्या सात दिवसांच्या आठवड्याचा करार उधळून लावला गेला. त्या लढ्याच्या व अन्य लढ्यांच्या इतिहासातून एक गोष्ट वरचेवर सिद्ध झाली आहे. ती म्हणजे इंटकचे नेतृत्व कामगार मानीत नाहीत. तरी तेच नेतृत्व लादायचा प्रयत्न शासन, मालक का करतात? इंटकशी बोलणी करून कामगार विरोधी करार का करतात? ह्या परिस्थितीत संपाचा दोष कामगारांना लावता येणार नाही. तर शासन, काँग्रेस व मालक ह्यांच्या कामगार विरोधी युतीलाच तो द्यावा लागेल.

ह्या ठिकाणी तात्कालिक आर्थिक-राजकीय प्रश्नांवरील चर्चा संपत आली होती. चहाचे कप पुढ्यात आले होते. कम्युनिस्ट पक्ष, त्यांची कार्यप्रणाली आणि लोकशाही संकेत ह्यांचा मेळ बसू शकतो का हा प्रश्न मनात घोळत होता. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष चीनच्या कह्यात कितपत आहे हाही प्रश्न ह्या संदर्भात डोकावत होता. माझ्या प्रश्नाचा रोख समजून, कॉ. बसू काहीशा कडवटपणे म्हणाले—

: आम्ही लोकशाही मार्गांनीच पुढे जायचा प्रयत्न करीत आहोत. परंतु त्या मार्गांनी यशस्वी होऊनही काय होते ते बंगालच्या संदर्भात मी सांगितलेच. लोकशाही मार्गांनीच कम्युनिस्ट राजसत्ता अस्तित्वात आली तर भांडवलदार, सैन्याला पुढे करून, इतर भांडवलशाही राष्ट्रांचा पाठिंबा घेऊन ते कम्युनिस्ट सरकार कसे उलथून पाडतात ते चिलीमध्ये स्पष्ट झाले आहे. अॅलेंदेची कम्युनिस्ट राजवट तिथे लोकशाही मार्गांनीच आली होती ना अधिकारावर? लोकशाही मार्गांनीच समाज परिवर्तनाचा कार्यक्रम तिथे चालू होता ना? लोकशाही मार्गांनी कम्युनिस्ट राजवट आली तरी, जोपर्यंत वर्गभेदांवर आधारित समाजरचना अस्तित्वात आहे तोपर्यंत ही राजवट टिकू शकत नाही हेच पुन्हा एकदा चिलीतल्या घटनांनी सिद्ध केले आहे.

: म्हणूनच बहुतेक सर्वत्र कम्युनिस्ट अधिकारावर आले ते जनआंदोलनातून, सिव्हिल वॉर मधून. अशा ठिकाणी विरोधी पक्षीयांना त्यांचे पक्षकार्य चालू ठेवू देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. चीनमध्ये कम्युनिस्ट पक्षाने चँग कै शेक राजवटीविरुद्ध सतत तीस वर्षे

झगडून चीन भांडवलशाही जोखडा-खालून मुक्त केला. तिथे चँग कै शेकच्या पक्षाला कार्य चालू ठेवण्याची परवानगी चिनी कम्युनिस्ट पक्षाने का द्यावी ?...

: इतर साम्यवादी राष्ट्राप्रमाणेच चीन बरोबरही सलोख्याचे संबंध असावेत असे आमच्या पक्षाला वाटते. त्याच्या बरोबरचे भारताचे, रशियाचे सीमेचे तंटे वाटाघाटींनी सुटावेत, युद्धांनी तुटू नयेत असे आमचे मत आहे. यात काही राष्ट्रविरोधी आहे किंवा चीन धार्जिणं आहे असे आम्हाला वाटत नाही. चीन बरोबरच्या युद्धाचा म्हणून आम्ही निषेधच केला होता. आम्ही चीनी पक्षाच्या हातचे बाहुले नाही हे पुढे चीनने आमच्या पक्षावर प्रखर टीका करायला सुरुवात केली तेव्हा आपोआपच सिद्ध झाले. आमच्या विरुद्ध त्यांनी नक्षलवाद्यांना चिथावले. त्यांना आजही चीनचे समर्थन लाभते. हे नक्षलवादी आज कुठे आहेत ? जवळ जवळ ७०० जे कडवे आहेत ते तुरुंगात आहेत. बाकीचे काँग्रेस पक्षात आहेत व खादीचे कपडे घालून मार्क्सवाद्यांचे खून पाडीत आहेत ! सांगायचे तात्पर्य इतकेच की, आम्ही ना चीनवादी ना रशियावादी ! दोघांची आम्ही स्तुती ही करतो नी वेळ पडेल तेव्हा प्रच्छन्न टीकाही करतो. रशियाबरोबरचा करार आम्हाला समर्थनीय वाटतो, चीन बरोबरची मैत्रीही आम्हाला मोलाची वाटते. चीनची भारतविरोधी भूमिका ही आम्हाला तिरस्करणीय वाटते. आमचे हे मतस्वातंत्र्य निव्वळ भारतनिष्ठेवर तावून सुलाखून आम्ही वापरतो. डांगेवादी कम्युनिस्टाचे तसे नाही...

सारांशाने मला एवढेच म्हणायचे आहे की काँग्रेसने देशाला अराजकाच्या नजिक आणून सोडले आहे. लोक विथरले आहेत. अशा वेळी डावी आघाडी आवश्यक आहे. तीच काँग्रेसला एकमेव पर्याय आहे. बंद गिरण्यांचे इतरत्रचे असंतोषाला तोंड फोडणारे संप, अन्नधान्याविरुद्धची जनआंदोलने ह्यातूनच हा डाव्या आघाडीचा मार्ग जातो. त्या मार्गावर आम्ही यशस्वी झालो तर देशाला, जनतेला, काँग्रेस-जमीनदार-भांडवलदार ह्यांच्या दुष्ट युतीतून निर्माण झालेल्या वणव्यापासून वाचवू शकू...

कॉ. अहिल्याबाई रांगणेकरांच्या घरून मुलाखत संपवून बाहेर पडताना कॉ. बसूंच्या वरील विचाराभोवती मन रेंगाळत होते. अशी युती शक्य आहे का ? उत्तर प्रदेशच्या निवडणुकासाठी मार्क्सवादी, दोन्ही समाजवादी वगैरे पक्षांची अशी युती झाल्याचे व ह्या युतीला मोठे यश मिळण्याची शक्यता असल्याचे कॉ. बसूंनी मला सांगितले. पण मग मुंबईत अशा युतीचा उमेदवार का सापडू शकला नाही ? अशी युती तरी काँग्रेसला खराखुरा पर्याय उभा करू शकेल का ? आणि अशी युती तरी टिकू शकेल का ? की शेवटी अराजकातूनच कॉ. बसू प्रणीत क्रांतीचा मार्ग जाईल ? वगैरे अनेक प्रश्नांचे उत्तर कालच देणार आहे. ● ● ●

# मोलकरी

## सदरहू सामंतांचा बाळ-बोध

'नवशक्ती' हे दैनिक, कसे कुणास ठाऊक, मी लहानपणापासून वाचीत आलो आहे. म्हणजे प्रभाकर पाध्यांचे तेव्हाचे संपादकीय आणि भाऊ पाध्यांचे आजचे 'सिनेमा आणि सिनेमावाले' हे सदर, या दोन टोकांमधल्या 'नवशक्ती'शी माझा बऱ्यापैकी परिचय आहे. सर्व दैनिके जशी लोकप्रिय आणि सर्वाधिक खपाची असतात तसेच 'नवशक्ती'ही आहे. सर्व दैनिकांना असते तसे 'नवशक्ती'ला स्वतःचे असे खास व्यक्तिमत्त्व आहे. 'नवशक्ती'मधील मजकुराइतकीच छपाईसुद्धा डोळ्यात भरणारी असते, असा माझा अनुभव आहे.

दैनिक 'नवशक्ती' तर वाचनीय असतेच; पण तिची रविवार-आवृत्ती विशेष वाचनीय असते. नवनवीन सदरे योजून ती रंजक आणि उद्बोधक करायचा या 'नवशक्ती'वाल्यांचा खटाटोप चाललेला असतो. 'बाळबोध' या बाळ सामंतांच्या हजारो वाचकांना आवडणाऱ्या सदराचेच पाहा ना. 'बाळ-बोध' सदरापूर्वी 'नवशक्ती'त खुसखुशीत असा मजकूर नव्हता; 'बाळ-बोध' सदराने ती उणीव भरून काढली, असे खुद्द सदर हू बाळ सामंत यांनी ३० डिसेंबरच्या अंकातील 'शेवटचा बाळ-बोध' या स्फुटात सांगितले आहे. आपला स्वाभाविक संकोच आणि विनय सोडून सामंतांनी ही गोष्ट सांगितली असल्यामुळे तिच्याबद्दल मी तरी काही शंका घेणार नाही.

बाळ सामंत मराठी साहित्यात विश्वविख्यात आहेत. ते स्वतःला सिद्ध-हस्त विनोदी लेखक मानतात. लोक तसे मानीत नाहीत. लोक नतद्रष्ट असतात. त्यांचा भरोसा कोणी धरू नये. लोक काय, पु. ल. देशपांड्यांनासुद्धा विनोदी लेखक मानतात. एकेकाच्या प्रतिमेची (प्रतिभेची नव्हे) पुण्याई असते ती. आता मी तसा बेरकी आणि इब्लिस इसम आहे; पण लोक मात्र मला सालस, सचोटीचा आणि समजुतदार मानतात. असो. बाळ सामंतांचे विपुल विनोदी साहित्य मी वाचलेले आहे; आणि त्यांना जसे ते विनोदी वाटते तसे मलाही ते विनोदीच वाटलेले आहे. मात्र त्यांच्या विनोदी साहित्यापेक्षा वृत्तपत्र-नियतकालिकातून वेळोवेळी त्यांनी चालवलेली खुसखुशीत आणि खणखणीत सदरे मला अधिक बरी वाटतात.

अशी सदरे नियमितपणे सतत लिहिणे अवघड असते. बाळ सामंतांना ते साधते. मराठी समाज आणि साहित्य-व्यवहार यांची बारीक माहिती त्यांना आहे. त्यातल्या विद्रूप व्यंगांची निर्भीड

हजेरी ते घेत असतात. त्यामुळे कोणी दुखावत नाही; उलट त्यांच्या लिखाणाचे दिलखुलासपणे स्वागत केले जाते, असे सामंतांनी नमूद केले आहे. सामंतांच्या या भाग्याचा मला हेवा वाटतो; कारण मी या सदरातून केलेल्या कौतुकानेसुद्धा माणसे बिथरतात, असे मला कळले आहे.

बाळ सामंत, ' नवशक्ती 'तले हे तीन वर्षे चाललेले आणि ' नवाकाळ 'चे संपादक नीळकंठ खाडिलकर, मुंबई विद्यापीठाचे उपकुलगुरू टोपे, माननीय मंत्री डॉ. रफिक झकेरिया, ' सोलकढी ' सदराचे लेखक अनंतराव या असामान्यांसुद्धा हजारो सामान्य वाचकांना फार्फार आवडलेले हे सदर नव्या वर्षापासून बंद करीत आहेत. आमची अशी आबाळ करणे बाळ सामंतांना शोभते काय ?

या निमित्ताने ' बाळ ' या नावाबद्दल काही लिहायला हवे. कुळकर्णी आड-नावाचा माणूस जसा टीकाकार होतो तसा बाळ नावाचा माणूस विनोदी लिहितो : बाळ गाडगीळ, बाळ गांगल, बाळ सामंत, ही उदाहरणे पाहा. लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांचे तसे काहीच या महाराष्ट्रात राहिले नाही. (जयंतराव टिळकसुद्धा काँग्रेसकी करू लागले ) नाव मात्र राहिले.

नव्या वर्षी तुम्ही-आम्ही काहीतरी नवे सुरू करतो; लोकमान्य बाळ सामंत आपले लोकमान्य सदर ' बाळबोध ' नव्यावर्षापासून बंद करीत आहेत. विसंगती हा, एकूण विनोदाचाच नव्हे तर बाळ सामंतांच्या विनोदाचाही आत्मा आहे, बरं का मुलांनो.

—अनंतराव


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यांत यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतला आहे. आजही वरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगमुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरीसराय (गया)**

# थोड्या कडू-गोड वातावरणात पार पडलेले

# ख्रिस्ती साहित्य संमेलन

सदानंद नाईक

गोरेगावच्या निसर्गरम्य ठिकाणी असलेल्या सेंट पायस कॉलेजच्या भव्य वास्तूमध्ये सातवे महाराष्ट्र ख्रिस्ती साहित्य संमेलन दिनांक २९ व ३० डिसेंबर १९७३ रोजी पार पडले.

संमेलनाची सुरुवात सौ. तारा नरोन्हा यांनी गायिलेल्या फादर स्टीफन्स यांच्या 'मराठी भाषेची थोरवी' या पसायदानाने झाली.

उद्घाटक होते प्रा. अनंत काणेकर. प्रा. काणेकर ना अहो ते कुठल्याही संमेलनाला उद्घाटक म्हणून, अध्यक्ष म्हणून जातील असे म्हणणाऱ्यांनी प्रा. काणेकरांचे उद्घाटनाचे भाषण निदान एकदा तरी ऐकावे. खुसखुशीत दिलखुलास गप्पांसारखे त्यांचे भाषण एक वेगळेच वातावरण निर्माण करते. त्यांच्या भाषणाने 'महाराष्ट्र ख्रिस्ती साहित्य संमेलनातील' 'ख्रिस्ती' हा शब्द केव्हाच वेगळा झाला आणि सुरू झाले एक खरेखुरे साहित्य संमेलन. ते म्हणाले, 'असे वेगळे साहित्य संमेलन भरवायचे प्रयोजन काय ? असे विचारले जाते. अहो खरे म्हणजे हे विश्वचि माझे घर या तत्त्वावर सगळ्या विश्वाचे एक संमेलन व्हायला हवे. पण वेगवेगळी संमेलने भरतातच ना, आणि ही वरवर दिसणारी हे विश्वचि माझे घर सारखी युनिव्हर्सल वृत्ती ही खरीखुरी संकुचित वृत्ती आहे. कारण सत्य परिस्थितीची दखल ती घेत नाही. या जगात विविधता आहे. वेगळ्या भाषा आहेत म्हणून जग, समाज जिवंत आहे प्रत्येकाने आपल्या मातृभाषेचा अभिमान बाळगणे रास्तच आहे. पण याचा अर्थ दुसऱ्याच्या भाषेचा तिरस्कार करावा असे नाही, आणि ललितसाहित्य — जे अंतःकरणाच्या अंतःकरणातून स्फुरते ते मातृभाषेतूनच व्यक्त झाले पाहिजे. भाषेमुळे आपलेपणा वाढतो. फादर स्टीफन्सने ज्ञानेश्वरांपेक्षा काकणभर जास्तच मराठीची स्तुती केली आहे' वगैरे वगैरे. खरे पाहिले असता प्रा. काणेकरांनी नेहमीप्रमाणे पण नेहमीपेक्षा काकणभर जास्त

गोड असे हे उद्घाटनाचे भाषण केले.

ते इतके गोड होते की ज्ञानेश्वर आणि फादर स्टीफन्स यांच्याविषयीच्या त्यांच्या विधानाचा अर्थ श्री. सुनील आढाव यांनी दुसऱ्या दिवशीच्या आपल्या भाषणात वेगळाच लावला. ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीपेक्षा फादर स्टीफन्सचे ख्रिस्त-पुराण काकणभर जास्त सरस आहे असे प्रा. काणेकरांनी म्हटल्याचे त्यांनी सांगितले. हॉल बाहेरच्या खाजगी चर्चेत प्रा. काणेकर तसे म्हणाले नाहीत तर मराठी भाषेच्या स्तुतीच्या संदर्भात त्यांनी ज्ञानेश्वर आणि फादर स्टीफन्स यांची तुलना केली असे त्यांच्या निदर्शनास आणून दिले, तेव्हा प्रा. डॉ. स. गं. मालशे यांच्यासारख्या व्यासंगी विद्वानांनीही आपल्या ख्रिस्तपुराणावरील प्रबंधात ज्ञानेश्वरापेक्षा फादर स्टीफन्स अधिक सरस आहे असे मत मांडले आहे असा हवाला श्री. सुनील आढाव यांनी दिला. वस्तुस्थिती वेगळीच आहे. डॉ. मालशे यांनी कुठेही असे म्हटलेले नाही. उलट तथाकथित ज्ञानदेवकृत योग-वासिष्ठामधील मराठी भाषेची स्तुती व फादर स्टीफन्सच्या क्रिस्त पुराणातील मराठी भाषेची स्तुती यामध्ये बरेच साम्य असल्याचे त्यांनी दाखवून दिले आहे. (मराठी संशोधन मंडळाने १९६५ साली प्रकाशित केलेले 'फा. स्टीफन्स आणि त्याचे क्रिस्तपुराण' लेखक — डॉ. स. गं. मालशे हे प्रकाशन पहावे.) प्रा. काणेकरांच्या विधानाचा असा अर्थ लावण्यात व प्रा. मालशे यांचा आपल्या विधानाच्या समर्थनार्थ (खाजगी चर्चेत का होईना) हवाला देण्यात श्री. आढाव यांच्याकडून काहीतरी गफलत झाली असावी. मला या ठिकाणी कसलीच तुलना करावयाची नाही. तसा गैरसमज नसावा. झालेला गैरसमज दूर व्हावा. व 'कांकणभर जास्त गोड' बोलल्यामुळं कशी गंमत होते हे निदर्शनास आणून द्यावे म्हणून हा प्रपंच. असो—

त्या नंतर नव्या संमेलनाचे अध्यक्ष रेव्ह. डॉमनिक ॲब्रियो, आपल्या अध्यक्षीय भाषणात मराठीला मानाचे स्थान, साहित्यसंस्थांची आवश्यकता, दलित साहित्याची प्रेरणा, त्या पार्श्वभूमीवर ख्रिस्ती साहित्याची प्रेरणा इ. मुद्यांचा ऊहापोह करताना म्हणाले 'आमच्या समाजाच्या विशिष्ट समस्या व दु:खे चित्रित करून आमच्या लेखकांना आमच्यामध्ये जागृती निर्माण करावयाची आहे व काही मिशनरी लोकांनी अतिउत्साहामुळे गतकाळात चुकीची पावले टाकली असतील त्याचे परिमार्जन करावयाचे आहे व राष्ट्रीय एकात्मतेचे स्वप्न साकार करण्यासाठी धडपड करावयाची आहे' इ. इ. अध्यक्षांचे हे भाषण सर्वस्पर्शी होते, त्याचबरोबर साहित्यिक मूल्यांना जपणारे होते. नादमधुर आवाजात सावधपणाने केलेल्या रेव्ह. ॲब्रियो यांच्या भाषणाने साहित्य संमेलनाला गंभीर पवित्र वातावरणात नेऊन सोडले.

आणि त्यानंतर श्री. स. ना. सूर्यवंशी यांनी 'आधुनिक साहित्यातील प्रेरणा आणि ख्रिस्ती लेखक' या आपल्या भाषणाने खळबळ उडवून दिली. ज्यांना

श्री. सूर्यवंशी यांची ओळख करून घ्यायची असेल त्यांनी साप्ताहिक 'आपण 'चे अंक पहावेत. या माणसातील मला आढळलेला एक गुण म्हणजे रोखठोकपणा, ताकाला जाऊन भांडे लपविण्याचा येथे प्रकार नाही. त्यांचे बोलणे ऐकणाऱ्याला पटणारे नसेल पण त्यांचे खुल्लम खुल्ला बोलणे विरोधाबरोबरच जवळीकही निर्माण करते. सूर्यवंशी एखादा धर्मप्रचारक बोलणार नाही एवढ्या अभिनिवेशाने बोलले. 'ख्रिस्ती साहित्यिकांनी ख्रिस्तापासून प्रेरणा घेऊन या जगाला ख्रिस्ताचा महान संदेश दिला पाहिजे' वगैरे हे त्यांच्या भाषणाचे सूत्र होते. त्या अनुषंगाने ख्रिस्तेतरांच्या (विशेषत: हिंदूंच्या) श्रद्धा, रूढी, भावना यावर ते प्रहार करीत होते आणि मला वाटते नेमके याच ठिकाणी ख्रिस्ताची शिकवण ते विसरत होते. नंतरच्या चर्चेत झालेल्या विरोधामुळे ते थोडेसे अस्वस्थ झाले होते. सूर्यवंशीच्या या भाषणावरील चर्चेत बोलताना कलात्मक मूल्य, अनुभूतीची मांडणी या गोष्टी या प्रबंधात दुर्लक्षिल्या गेल्या आहेत. ख्रिस्ताच्या प्रेरणेने लिहावयाचे म्हणजे ख्रिस्ती लेखकाला हल्ली जे लिहिलं जात आहे (ज्याला अश्लील वगैरे म्हटले जाते) ते लिहिता येणार नाही. अशा तऱ्हेचे कुंपण साहित्याला घालणे योग्य नाही अशी मते अनेकांनी मांडली श्री. अशोक टिळक यांनी 'जे जुने आहे ते टाकून दिलेच पाहिजे असे नाही, या देशाने, महाराष्ट्राने आपल्यावर संस्कार घडविले आहेत ते टाकाऊ म्हणणे योग्य नाही' असे सांगितले. या चर्चेत खरे मौलिक मुद्दे उपस्थित केले ते प्रा. रा. भि. जोशी यांनी. 'निखळ साहित्याशी—शेक्सपीयर, डिकन्स यांच्या वाङ्मयाशी ख्रिस्ताचा स्वीकार करण्याचा काही संबंध नाही. ते साऱ्या जगाचे आहे. ख्रिस्तापासून प्रेरणा घेऊन लिहिणे म्हणजे काय ?

१ : ख्रिस्ताच्या शिकवणीबद्दल आस्था असणे, ती पटणे त्या प्रेरणेतून साहित्य लिहिणे की.

२ : ख्रिस्ताचा स्वीकार केल्यानंतरच मिळणाऱ्या प्रेरणेतून लिहिणे ? असे मुद्दे त्यांनी उपस्थित केले. अश्लीलतेच्या संदर्भात ते म्हणाले ख्रिस्ताचा स्वीकार केलेल्यांकडून ते साहित्य प्रथम लिहिले गेले व नंतर इकडे आले. श्री. सूर्यवंशी यांच्या खऱ्या ख्रिस्ती साहित्यिकाला याचे वावडे असले पाहिजे या मताला ते उत्तर होते. डॉ. सदा कऱ्हाडे यांनी सोशल कमिटमेंटचे आपले तत्त्वज्ञान सूर्यवंशीवर लादले. श्री. सूर्यवंशी यांनी या मुद्यांची उत्तरे दिली नाहीत. किंवहुना त्यांचा विचार करण्याचीही त्यांची तयारी नव्हती. 'ख्रिस्ती साहित्य संमेलनातील ' 'साहित्या'-पेक्षाही 'ख्रिस्ती'ला त्यांच्या मते अधिक महत्त्व होते. पण नवीन ख्रिस्ती तरुण लेखकांना ते मान्य नव्हते. हे जेवणाच्या वेळी आपआपसात चाललेल्या चर्चेतून दिसून येत होते.

जेवणानंतरच्या अधिवेशनाची सुरुवात सौ. तारा नरोन्हा यांच्या

वसई परिसरातील ख्रिस्ती लोकगीते' या निबंध वाचनाने झाली. लोकगीतांचा काव्यात्म परिचय आणि त्या परिसरातील मंडळींनी ती गाऊन दाखविली त्यामुळे हा कार्यक्रम चांगलाच रंगला होता. सौ. ताराबाई ही लोकगीते एकत्रित करून आपल्या निवेदनासह प्रसिद्ध करणार आहेत. एका समाजजीवनाचे, मनाचे खरेखुरे दर्शन घडविणारे हे अपौरुषेय वाङ्मय सर्वांना उपलब्ध झाले पाहिजे.

श्री. भास्कर जाधव यांचा 'सन १९०० नंतरची ख्रिस्ती नियतकालिके' हा प्रबंध माहितीपूर्ण होता. विशेष म्हणजे दुर्मिळ नियतकालिकांचा आपला संग्रह त्यांनी प्रदर्शनात मांडला होता.

संध्याकाळच्या 'समाजनिहाय साहित्य संमेलने भरवावीत काय?' या परिसंवादात 'आम्ही वेगळे आहोत. समाजातील सगळेच घटक निरनिराळे आहेत, मराठीत विशिष्ट वर्गाची मिरासदारी आहे. आमच्याकडे जगाला सांगण्यासाठी वेगळा संदेश आहे' इ. गोष्टी सांगून श्री. सूर्यवंशी यांनी वेगळ्या साहित्य संमेलनाची आवश्यकता प्रतिपादन केली. त्याचा समाचार श्री. वसंत देशमुख यांनी घेतला. 'साहित्याला जात नसते. प्रेषितांचे मार्ग आणि वाङ्मयाचे मार्ग वेगळे आहेत. दोघांची गल्लत करणे योग्य नाही. अशा तऱ्हेच्या वेगवेळ्या संमेलनांनी समाजाचे नुकसान होईल' असे सांगितले. फादर रॉड्रिग्ज यांनी श्री. सूर्यवंशी यांचे जोरदार समर्थन केले. तोच आवेश, तोच अभिनिवेश, तेच समर्थन—आमचे जीवन निराळे आहे, ख्रिस्ताचा धर्म निराळा आहे, वगैरे वगैरे...श्री. वसंत फेणेनी श्रोत्यांच्या बुद्धीला आवाहन केले. अशा तऱ्हेची समाजनिहाय संमेलने योग्य नाहीत असे सांगताना एक दोन वर्षांपूर्वी भरलेल्या सारस्वत परिषदेवरही त्यांनी कोरडे ओढले. आपले परखड विचार समर्थपणे मांडताना त्यांनी भरपूर टाळ्या घेतल्या. डॉ. सदा कऱ्हाडे यांनी 'विविधतेतून एकात्मता हे भारतीय तत्त्वज्ञानाचे एक लक्षण असल्याने वेगळ्या साहित्य संमेलनाचे समर्थन करताना प्रस्थापित साहित्यिकांची मिरासदारी वाढली असून त्याने समाज आणि साहित्य यातील नाते तोडून टाकले आहे. साहित्य हे वाचकांच्या जाणीवा विस्तार करण्यासाठी असले पाहिजे' असे सांगितले. रेव्ह. अँब्रियो यांनी परिसंवादाचा समारोप केला. रात्री झालेल्या कविसंमेलनात श्री. रॉक कार्व्हालो, कैतान दोडती आदींचे काव्यगायन झाले.

दुसऱ्या दिवशी श्री. सुनील आढाव यांच्या 'ख्रिस्ती कवींचे काव्य' या निबंधाने धमाल उडवून दिली. 'काव्याच्या कसोट्या लावल्या तर ख्रिस्ती काव्याचा टिकाव लागत नाही.' ख्रिस्ती काव्यातील उणीवा सांगताना ती 'धर्मा'मध्ये गुरफटलेली आहेत. या गोष्टीचा त्यांनी प्रामुख्याने उल्लेख केला व 'त्यामुळे जवळ प्रतिभा असून सुद्धा ख्रिस्ती कवींना जातिवंत कविता लिहिता आली नाही. इतर भाषांतील

काव्याच्या मानाने ती मागे पडली' असा त्यांच्या विवेचनाचा सूर होता. निव्वळ काव्याच्या कसोटयावर ख्रिस्ती काव्याचे मूल्यमापन करण्याचा त्यांचा प्रयत्न स्तुत्य होता. पण निबंध एकांगी झाला होता. या निबंधामुळे बरेच जण दुखावले गेले. काही कवींना अनुल्लेखाने मारण्यात आले, त्यात प्रॉटेस्टंट कॅथॉलिक असा भेदभाव करण्यात आला, निबंध तयार करताना परिश्रम घेतले नाहीत इ. आरोप प्रत्यारोप करण्यात आले. डॉ. कऱ्हाडे यांनी 'उपासना काव्य' हे उत्तम काव्य होऊ शकते. तुकारामाचे अभंग हे उत्तम काव्य आहे असे सांगितले. तर श्री. अशोक टिळक यांनी स्व. रेव्ह्. ना. वा. टिळक यांची ख्रिस्ती धर्म स्वीकारण्यापूर्वीची (हिंदू) भक्तीपर कविता व धर्मांतरानंतरची (ख्रिस्त) भक्तीपर कविता यात सारखीच उत्कटता आढळते असे सांगितले. सौ. तारा नरोन्हा यांनी या निबंधात प्रत्यक्ष काव्यावर थोडी चर्चा झाली असती तर बरे झाले असते आणि थोडे इन्सेन्टिव्ह् कमी पडले असे सांगितले. एकंदरीत ही चर्चा चांगलीच रंगली. श्री. आढाव यांनी काव्य कमी दर्जाचे आहे हे सांगताना ते कसे कमी दर्जाचे आहे हे सांगितले असते तर निबंध अधिक चांगला झाला असता.

या नंतर श्री. अँड्र्यू कोलॅसो यांनी 'फादर मिरांडा व्यक्ती आणि वाङमय' या विषयावर छोटा पण माहितीपूर्ण निबंध वाचला. फादर मिरांडाच्या साहित्याचा थोडक्यात आढावा घेऊन त्यांच्या कार्याचे दर्शन घडविले. फादर मिरांडा यांनी १९४३ साली 'भू-कमळे' हे कादंबरीवजा पुस्तक प्रसिद्ध केले. त्यात लैंगिक विषयाची चर्चा करण्यात आल्यामुळे तीस वर्षांपूर्वी वसईतील ख्रिस्ती समाजात या पुस्तकाने खळबळ निर्माण केली. त्या पुस्तकाचा सुरेख परिचय निबंधात करून देण्यात आला.

संध्याकाळच्या खुल्या अधिवेशनात सात आठ ठराव संमत करण्यात आले. त्यापैकी बरेच सामाजिक, राजकीय म्हणजेच साहित्यबाह्य विषयांशी संबंधित होते. ख्रिस्ती समाज अल्पसंख्यांक आहे, त्याच्यावर जुलूम होतो, अन्याय होतो त्याची दखल शासनाने घ्यावी, ख्रिस्ती समाजातील माणसाला वाव मिळत नाही तो मिळाला पाहिजे, चित्रपटांतून ख्रिस्ती माणसाचे विकृत चित्रण केले जाते ते थांबले पाहिजे अशा सारखे ठराव मांडले गेले व संमतही झाले. श्री. जोसेफ नरोन्हा यांनी आपण मराठी ख्रिस्ती राजकीय संमेलनाला


**पूर्णिया**

अनिल अवचट

सहा रुपये

राजहंस प्रकाशन

जमलो आहोत की काय अशी पृच्छा केली व ज्या कारणासाठी हे साहित्य संमेलनाचे व्यासपीठ वापरले जात आहे त्याबद्दल आपली तीव्र नापसंती व्यक्त केली. अॅडव्होकेट श्रीमती ज्योत्स्ना त्रिभुवन यांनी घटनेने सर्वांना सारखच अधिकार दिले आहेत त्यामुळे अशा प्रकारचे ठराव मांडण्याची फारशी आवश्यकता नाही असे विचारपूर्ण निवेदन केले. श्री. उजगरे यांनीही आपण राजकीय पक्ष म्हणून या ठिकाणी जमलेलो नाही तर साहित्यिक म्हणून एकत्र आलो आहोत या गोष्टीचा विसर पडू देऊ नका असे सांगितले. श्री. सूर्यवंशी, आंग्रे आदि मंडळींनी आणलेल्या या ठरावांचे समर्थन अध्यक्षांनी केले. फादर अॅन्त्रियो यांनी प्रत्येक वेळी तणाव वाढू न देता अगदी सावधपणे परिस्थिती हाताळली. एकूण संमेलन खेळीमेळीच्या वातावरणात (राष्ट्रगीतानंतर) पार पडले.

श्री. सूर्यवंशी, आढाव व इतर बऱ्याच मंडळींनी स्व. वा. लक्ष्मीबाई टिळक यांनी नागपूर येथे डिसेंबर १९३३ मध्ये झालेल्या मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेले भाषण वाचले असते तर मला वाटतं कदाचित त्यांची भाषणे–निबंध एवढे प्रक्षोभक झाले नसते. त्या अध्यक्षीय भाषणात वेगळे साहित्य संमेलन कशासाठी हे सांगताना आधीच्या संमेलनाचे अध्यक्ष देवदत्त टिळक यांनी दिलेल्या कारणांची पुनरावृत्ती त्यांनी केली. साहित्यलक्ष्मी म्हणाल्या होत्या –

१ : आम्ही ख्रिस्ती लोक वाङमयदृष्ट्या फार मागे आहोत.

२ : वाङ्मय दृष्ट्या आम्ही मागे असल्यामुळे त्या (मोठ्या – महाराष्ट्र साहित्य संमेलनात) संमेलनात आमचे पुरेसे कोडकौतुक होण्याचा संभव कमी.

३ : आमच्या आचार विचारांनी, धार्मिक विधींनी व धर्मशास्त्राने पूर्णपणे मराठी पेहराव अजून घ्यावयाचा आहे.

या परिस्थितीत आज देखील काही बदल झालेला दिसत नाही. मात्र आजच्या साहित्यसंमेलनात माझ्यासारख्या साहित्यप्रेमी व्यक्तीला एक आनंदाची गोष्ट मात्र निश्चितच जाणवली – श्री. जोसेफ नरोन्हा, श्री. हरिश्चंद्र उजगरे यांच्यासारखे उमदे विचार असलेले व सत्याला सामोरे जाणारे विचारवंत लेखक पुढे येत आहेत व मराठी ख्रिस्ती तरुणात – (साहित्यिक) एक जागृती निर्माण होत आहे. साहित्य संमेलनात झालेल्या चर्चा व हॉलबाहेर झालेल्या खाजगी चर्चांतून जाणवलेल्या या गोष्टी स्वागतार्ह आहेत.

● ● ●

# कलकत्ता मेल

सौ. तारा पंडित

## उपकुलगुरुंच्या खुर्चीत विद्यार्थी

इतक्यात गंमतच झाली. नाव मोठ नि लक्षण खोटे ! रविंद्र भारती विद्यापीठ म्हणजे विश्वविख्यात टागोरांचे अपत्य. आदराने कुणाचीही मान झुकावी असे. सकाळ-दुपार-सायंकाळ वर्ग चालत असतात तिथे. पण अगदी अलीकडेच इव्हिनिंग शिफ्टच्या विद्यार्थ्यांनी ओरड केली प्रचलित व्ही. सी. आम्हाला नको म्हणून. हे मानाचे स्थान भूषविणाऱ्या वयोवृद्ध महिला म्हणजे डॉ. रोमा चौधरी. त्यांच्या कारकीर्दीत पन्नास हजारांची अफरा-तफर झाली म्हणून ही ओरड होती. विद्यार्थ्यांनी जाब विचारला. बाईंना तीन दिवसांचा अवधी दिला. पण तरीही त्यांचे उत्तर तयार नव्हते. विद्यार्थी म्हणाले, इतःपर आपणाला येथे येण्याची आवश्यकता नाही. आम्ही आमचे पाहून घेऊ. आणि खरोखरच एका विद्यार्थ्याची निवड झाली आणि त्याला व्ही. सी. च्या खुर्चीत बसविण्यात आले. कारभार त्याचे हाती सोपवण्यात आला. दुसरे दिवशी दुसरा विद्यार्थी व्ही. सी. बनला. अशा तऱ्हेने त्यांच्या पाळ्या सुरू झाल्या. रोज व्ही. सी. बदलत राहिला. आपली कार्यतत्परता सिद्ध करून दाखविण्यासाठी सर्व विद्यार्थी वर्गात व्यवस्थित हजर राहिले. एरवी वर्ग बुडवून टवाळक्या करीत हिंडणारी मुले वर्गात नियमित बसू लागली. अशा अवस्थेत तीन-चार दिवस गेले. बाईंना वाटले लक्षणे ठीक दिसत नाहीत. आता शांततेची बोलणी करायलाच हवीत. त्यांनी सभा बोलावली आणि विद्यार्थी-प्रतिनिधींना निमंत्रण धाडले. पण सभेला एकही व्यक्ती हजर नव्हती. बाई वाट पाहून थकल्या. रिकाम्या खुर्च्या बघून नाईलाजास्तव उठून गेल्या. दुसऱ्या दिवशी व्ही. सीं. च्या खुर्चीत नवा चेहरा झळकू लागला. नव्या हातात कारभार आला. अशा तऱ्हेच्या घटना परदेशातही घडत नसाव्यात. त्यादृष्टीने आमचा देश आघाडीवरच आहे असे म्हणायला हरकत नाही. □

## भिजत घोंगडे

बसभाडे पाच पैशांनी वाढले आणि लोक भडकले. डाव्या पक्षाच्या लोकांनी आगीत तेल ओतले. लोक भाडे देईनासे झाले. फुकट प्रवास करू लागले.

साहजिकच बसच्या उत्पन्नात जबरदस्त तोटा होऊ लागला. प्रायव्हेट बसेसच्या बाबतीत जास्तच.

बसवाल्यांनी ट्रान्सपोर्ट मिनिस्टरला

तक्रारी सांगितल्या. ह्या तक्रा ी ऐकता ऐकता एक दिवस चार वाजून गेले. बिचारा मिनिस्टर उपाशी राहिला. कंडक्टर लोक आपापले अनुभव सांगत होते. लोक कसे वागतात ते कथन करीत होते. पोरीसुद्धा काही कमी नाहीत म्हणाले, वीस पैशांचे एकच तिकीट घ्यायचे नि दोघींनी अर्धअर्ध फाडून घ्यायचे असे ह्या मुली करतात, किंवा पंधरा पैशांच्या तिकिटाला एखादी बाई दहा पैसे देते नि वर म्हणते घ्यायचे असतील तर घे नाहीतर राहू दे. आणि लागलीच नाणं पर्समध्ये जाते देखील. म्हणजे पंधरा पैसे तर देतच नाहीत पण पूर्वी दहा पैसे मिळायचे तेही आता मिळत नाहीत. इधरसे भी गये, उधरसे भी गये. बस चक्क तोटचात धावतेय.

अशा अनेक तक्रारी. ट्रान्स्पोर्ट मिनिस्टरचे कान दुखू लागले. त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे बोट दाखवलं. त्यांनी हायकोर्टाचे रिटायर्ड जस्टिस श्री. बिनायक बॅनर्जी यांचे वन्-मॅन कमिशन बसवले, आणि त्यांचेवर सर्व जबाबदारी सोपवली.

लोकांच्या तक्रारी ऐकून घेण्यासाठी बॅनर्जी साहेब पब्लिक मीटींगमध्ये बसले. पण तेथे इतका हलकल्लोळ माजला की मुख्य मुद्दा दूरच राहिला. शांतताच प्रस्थापित होईना. मग बॅनर्जींनी विचार बदलला. आपल्या केबिनमध्ये बसूनच तक्रारी ऐकायचे त्यांनी ठरवले. बोलणाराच फक्त आत येईल. आपण शांतपणे समजून घेऊ शक असे त्यांना वाटले. छात्र परिषदेचा प्रतिनिधी आत आला. बोलू लागला. मध्येच म्हणाला, वाटल्यास माझ्या मित्रांना विचारा. त्यांना आत बोलावून घ्या. ते सगळे बाहेर उभेच होते. आत शिरायच्या संधीची वाटच पहात होते. धडाधड आत शिरले. सगळेच एकदम बोलू लागले. भलताच गोंधळ माजला आणि बॅनर्जीसाहेबांचा पेशन्स खलास झाला. मीटींग दुसऱ्या दिवसापर्यंत तहकूब केली. दुसऱ्या दिवशी पुन्हा तेच. अशाच अवस्थेत त्यांनी जाहीर केले की जानेवारी अखेर मी आपला निर्णय सांगेन जर शांततेने सारे काही पार पडेल तर. असाच गोंधळ होत राहिला तर फेब्रुवारी अखेरपर्यंतचा अवधी लागेल. माझा नाईलाज आहे.

हा निर्णय नाही तोवर त्यांना कमिशनचे पैसे मिळत राहतील. हा निर्णय नाही तोवर लोक जास्त भाडे देणार नाहीत. आणि हा निर्णय नाही तोवर प्रायव्हेट बसवाले बसेस रस्त्यावर काढणार नाहीत. – हेच ते भिजत घोंगडे !

● ● ●

विधानसभेतील प्रश्नोत्तरांवर आधारित

# अजब तुझे सरकार !

सु. ल. सोमण

प्रश्न क्रमांक १४३०० : दिनांक ३ ऑगस्ट १९७३ : आमदार श्री. वि. बा. खादीवाले, उदगीर, उस्मानाबाद.

— सन्माननीय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय ?

१. उस्मानाबाद जिल्ह्यातील किती ज्युनिअर ट्रेंड पदवीधर शिक्षकांच्या नेमणुका प्राथमिक शाळेवर मुख्याध्यापक म्हणून केल्या आहेत ?

२. सदर नेमणुकांमुळे सीनियर प्राथमिक शिक्षकात असंतोष पसरला आहे, हे खरे आहे काय ?

३. असल्यास ह्याबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

**उत्तर : शिक्षणमंत्री श्री. अनंत नामजोशी.**

१. ८ (आठ).

२. होय.

३. ज्युनिअर ट्रेंड पदवीधर शिक्षकांना त्यांच्या मूळ पदावर पदावनत करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. पण न्यायालयाच्या आदेशानुसार ते आदेश स्थगित ठेवावे लागले.

— ज्येष्ठता क्रमाचे वादंग फक्त न्यायालयातच नाहीत तर ! न्यायमूर्तींनो, झटकन शासनाचे, मुख्याध्यापकांना पदावनत करणारे आदेश कायदेशीर घोषित करून टाका. हो, म्हणजे निदान तुम्हाला तरी वरिष्ठ जागेसाठी ‘ ज्येष्ठता क्रमा ’च्या नियमानुसार भांडता येईल !

— पदावनतच करायचे तर मुख्याध्यापक केलेतच का, असा प्रश्न बहुधा आठ शिक्षकांनी केला असावा. त्यांना उत्तर एकच : ‘ भारतीय लोकशाहीतल्या कार्यपद्धतीची त्यांना काही जाणच नाही ! ’ ◻

प्रश्न क्रमांक १४३८३ : दिनांक ३ ऑगस्ट १९७३ : सर्वश्री आ. डॉ. वि. कृ. तोरस्कर, माझगाव, मुंबई; आ. डॉ. श्री. द. नातू, गुहागर; आ. श्री. प्रमोद नवलकर, गिरगाव, मुंबई.

— सन्माननीय गृहनिर्माण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :

१. अभ्युदय नगर, काळाचौकी येथील इमारत क्रमांक १४ व १८ येथील रहिवाशांनी इमारतीच्या भिंतींना भेगा पडल्यामुळे आणि इमारतींच्या गाळ्याचे (गॅलरी) भाग नादुरुस्त झाल्यामुळे

त्यांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे अशा प्रकारच्या तक्रारी मार्च ते मे १९७३ मध्ये गृहनिर्माण मंडळाच्या अधिकाऱ्याकडे गेल्या आहेत हे खरे आहे काय ?

२. असल्यास, ह्या तक्रारींबाबत काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे ?

**उत्तर : गृहनिर्माण मंत्री ना. यशवंतराव मोहिते.**

१. होय.

२. भितींना भेगा पडलेल्या नाहीत. परंतु आर. सी. सी. कॉलम्स थोडे खराब झाल्याचे दिसतात. तसेच काही गाळ्यांचे प्लम्स बाहेर गेले आहेत व काहींची नादुरुस्ती झाली आहे. परंतु त्यामुळे रहिवाशांच्या जीवितास धोका नाही. इमारत क्रमांक १८ मधील पॅरॅपेट भिंती ज्यांना थोडी दुरुस्ती (Minor Repairs) पाहिजे होती त्या भिंती दुरुस्त करण्यात आल्या आहेत. तसेच इमारत क्रमांक १४ व १८ मधील ज्या गच्च्यांचे प्लम्स बाहेर गेले आहेत व त्यांना संपूर्ण नूतनीकरणाची गरज आहे. त्यासाठी रुपये ३८,१०० चे अंदाजित खर्चाचे आराखडे बनविले आहेत. त्यांना मंजुरी मिळताच पावसाळ्यानंतर हे दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येईल. आर. सी. सी. कॉलम्सच्या दुरुस्तीचे आराखडे तयार करून त्यास मंजुरी मिळविण्यात येत आहे.

—अभ्युदयनगर वासियांनो, 'गृहनिर्माण' मंडळाच्या 'इमारत—शास्त्रा'ची काहीच कल्पना तुम्हाला नाही असे दिसते. एरवी नुसत्या भेगांनी आणि गाळ्यांच्या (गॅलरी !) नादुरुस्तींनी तुम्ही एवढे हबकून गेलाच नसतात. अहो, हौसिंग बोर्डाच्या नव्या कोऱ्या इमारतींना देखील भेगा असल्याच्या तक्रारी असतात, माहीत नाही तुम्हाला ? तेव्हा काही एवढ्याशानी घाबरून जायचं कारण नाही !

—भेगांचे आणि गच्च्यांचे काय घेऊन बसलात ! गिरणगाव आणि गिरगावातल्या चाळीतून पाय ठेवला की आख्ख्या चाळी गदगदायला लागतात. तिथे जिवीताला धोका उत्पन्न व्हायचा प्रश्न उद्‌भवत नाही, तुमच्या १४-१७ तल्या भेगांनी काय होणार ?

प्रश्न क्रमांक १५५८० दिनांक ७ ऑगस्ट, १९७३ : सर्वश्री आ. श्री. व. ज. कार्लेकर, वर्धा; श्रीमती प्रतिभा तिडके, मुर्तिजापूर; श्री. के. मो. झाडे, हिंगणघाट, वर्धा.

—सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय ?

१. महाराष्ट्र राज्यात सर्वत्र देशी दारूच्या दुकानांना परवानगी दिली जात असतांना फक्त वर्धा शहर व वर्धा शहराच्या १० किलोमीटर सभोवतालचा परिसर ह्यामध्ये देशी दारूच्या दुकानांना परवानगी नाकारण्यात आली आहे, हे खरे आहे काय ?

२. असल्यास, परवानगी नाकारण्याची कारणे कोणती ?

**उत्तर : दारूबंदी मंत्री ना. मो. भ. पोपट**

१ व २ : वर्धा जिल्ह्यातील सेवाग्राम,

पवनार आणि वर्धा या तीन ठिकाणी तसेच या तीन ठिकाणापासून ८ किलोमीटरच्या परिसरामध्ये देशी दारू विक्रीचे दुकान मंजूर करू नये असे शासनाने ठरविले आहे. जनमानसात सेवाग्राम आश्रम व पवनार आश्रम ही पवित्र ठिकाणे मानली जातात. ह्या स्थानाबद्दल वाटत असलेला आदर तसेच या आश्रमाचे वर्धा शहराशी असलेले वैचारिक संबंध व प्रत्यक्ष सान्निध्य लक्षात घेऊन उपरोक्त निर्णय घेण्यात आला.

—म. गांधी व आचार्य विनोबा ह्या दोन महात्म्यांची वर्धा ही कर्मभूमी. तिथे त्यांचे आश्रम. त्यांचा मद्यपानाला तीव्र विरोध ! म्हणून त्यांच्या आश्रमांच्या परिसरातच फक्त, मद्यविक्रीच्या दुकानांना बंदी. काय स्तुत्य कल्पना नाही ? एवढा परिसर सोडून इतरत्र मुक्त मद्यपान झाले तर काहीच बिघडत नाही !

—ह्याचप्रमाणे भ्रष्टाचार, काळाबाजार, उधळपट्टी, हरिजनावरील अत्याचार, अनाचार वगैरे महात्माजींनी निषेधिलेले प्रकारही, ह्या परिसर सोडून, इतरत्र बेलगाम चालले तरी काहीच हरकत नाही अशीच समजूत तर शासनाची झालेली नाही ना ?

—ह्या परिसरात परदेशी दारूच्या विक्रीला परवानगी असेलच ना हो दारूमंत्री (चुकलो, दारूबंदी मंत्री !) साहेब ?

प्रश्न क्रमांक १५७३६ दिनांक ७ ऑगस्ट, १९७३ : आमदार श्री. वि. चं. मस्के, कळमनुरी, परभणी.

—सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय ?

१. परभणी जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यात एकूण किती न्यायपंचायती आहेत व त्यापैकी सध्या किती कार्यक्षम आहेत ?

२ ज्या न्यायपंचायती कार्यक्षम नाहीत त्या तशा असण्याची सर्वसाधारण थोडक्यात कारणे काय आहेत व त्या कार्यक्षम करण्यासाठी कोणती उपाय योजना केली आहे ?

उत्तर : मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक

१ व २. राज्यातील अधिकांश न्याय पंचायती कार्यक्षम नसल्यामुळे बोंगिरवार समितीच्या शिफारशीनुसार त्या रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे म्हणून ही माहिती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

—अकार्यक्षम म्हणून न्यायपंचायती रद्दच करणार, मग त्या अकार्यक्षम का ह्या माहितीच्या तपशीलात, कारणे समजून घेण्यात हंशीलच काय ? उगाच त्यामुळे इतर ठिकाणच्या अकार्यक्षमतेवरच इलाज पटकन् सापडून गेले तर ? ◘

प्रश्न क्रमांक १४१८६ दिनांक २१ ऑगस्ट, १९७३ : आ. श्रीमती मृणाल गोरे, मालाड, मुंबई. आ. श्री. निवृत्तीराव गायधनी, देवळाली, नासिक.

— तारांकित प्रश्न क्रमांक ५७२७ याला दि. १३–१२–७२ रोजी दिलेल्या उत्तराचे संदर्भात सन्माननीय नगर

विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :—

१. दारणा नदीतून सिन्नर शहराला नळाद्वारे पाणी देण्याच्या योजनेला शासनाने मंजुरी दिली आहे काय? असल्यास सदर योजनेचे स्वरूप काय आहे?

२. हे काम केव्हा सुरू व पूर्ण होईल?

**उत्तर : नगरविकास मंत्री डॉ. रफिक झकेरिया :**

१. होय. या योजनेला शासकीय मान्यता दिनांक ५ एप्रील १९७३ रोजी दिली असून तांत्रिक मान्यताही दिनांक १८ एप्रील १९७३ रोजी दिली आहे. सिन्नर पाणी पुरवठा योजनेचे स्वरुप खालील प्रमाणे आहे.

या योजनेचा अंदाजित खर्च रु. ४३,५०,३०० आहे. या योजनेद्वारा बाभळेश्वर गावानजिक दारणेतून रोजी ४·८ लक्ष गॅलन पाणी पंपाने खेचणे व ते निवळून व क्लोरीन मिसळून सध्याच्या वितरण व्यवस्थेतून शहराला पुरविणे. यासाठी सध्या अस्तित्त्वात असलेल्या टाकीव्यतिरिक्त आणखी एक टाकी बांधण्याचे योजिले आहे.

२. या योजनेचे काम अद्याप सुरू झाले नाही. निविदा मागविण्यात येत आहेत. निधी उपलब्ध झाला तर या योजनेचे काम तीन वर्षाच्या कालावधीत पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

—गेल्या वर्षीचं दुर्भिक्ष, वाढत्या किंमती, पेट्रोलचा जागतिक कडाका आणि त्यात बॅक बे, जुळी मुंबई वगैरे सिन्नरवासियांच्या पाण्यापेक्षा महत्वाच्या योजना! शिवाय उत्तर प्रदेश वगैरे ठिकाणच्या व साखर कारखान्यांच्या निवडणूका आहेतच!! तेव्हा तूर्त, सिन्नरकरांनो, पाण्यासाठी पैसा उपलब्ध होणे जरा कठिणच. बाकी, तुम्ही समजून घ्यालच म्हणा २५ वर्षांच्या अनुभवावरून!!

प्रश्न क्रमांक १८०९० : दिनांक २४ ऑगस्ट, १९७३ : आमदार श्री. ब. मा. गुरपुडे, ब्रह्मपुरी, चंद्रपूर.

—सन्माननीय महसूल मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.

९. चंद्रपूर जिल्ह्याती ब्रह्मपुरी तहसीलमधील सावळगाव सन १९६१ मध्ये पूरपीडित म्हणून जाहीर केले असून गावठाणासाठी १५ एकर जागा मुक्रर केली असून अजून त्या जागेचे प्लॉट पाडण्यात आले नाहीत हे खरे आहे काय?

२. असल्यास जागेचे प्लॉट पाडण्यास विलंब होण्याचे कारण काय व हे काम त्वरित करण्यात यावे म्हणून शासने काय व्यवस्था केली आहे अगर करण्याचा विचार आहे?

**उत्तर: महसूल मंत्री ना. भाऊसाहेब वर्तक :**

१. नाही. सुरुवातीस सुमारे ६ हेक्टर (१५ एकर) जमीन संपादन करण्याचे ठरविले होते. तथापी, नंतर हेक्टर १·६१ आर (३.९७ एकर) जमीन संपादन करून त्याचे प्लॉटस पाडण्यात आले आहेत.

२. प्रश्न उदभवत नाही.

मुळात १५ एकर आवश्यकतेनुसार ठरवून, त्या ऐवजी फक्त चार एकरच जमीन संपादन करण्यात आली हेच मुळी आमदार साहेबांना माहित नाही, आणि फुक्कट प्रश्न विचारीत सुटतात झालं !

बाकी माहिती आमदारांना बरोबर नव्हती तेही बरेच म्हणा ! नाही तर जमीनच का कमी संपादन केली म्हणून विचारीत बसले असते ! !

चार एकर जमिनीचे प्लॉट्स पडले पण गावठाण उभे राहिले की नाही कोण जाणे ? जरा शंकाच आहे. नाही ?

प्रश्न क्रमांक १८१७५ दिनांक २३ ऑगस्ट, १९७३ आमदार श्री. शरद दिघे, वरळी, मुंबई. आमदार श्री. गु. नू. बनातवाला, उमरखाडी, मुंबई.

दिनांक १६ फेब्रुवारी १९७३ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक ८५३२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय विधी व न्याय मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय ?

१. मुंबई लघुवाद न्यायालयातील न्यायाधीशांनी ऑगस्ट १९७३ मध्ये किंवा त्या सुमारास माननीय मुख्य मंत्र्यांकडे एक अर्ज पाठवून आपल्या पगार वाढीचा विचार करण्याची जी विनंती करण्यात आली होती या संबंधी काही निर्णय घेण्यात आला आहे काय ?

२. असल्यास तो काय आहे ?

**उत्तर : विधी व न्याय मंत्री बॅ. ए. आर. अंतुले.**

१. नाही.

प्रश्न उदभवत नाही.

वकीलांनो, न्यायाधीशांनो आणि आमदारांनो ! स. मंत्र्यांच्या 'नाही' उत्तरावर 'why not ?' असे चवताळून विचारू नका. केंद्रीय न्याय मंत्री श्री. हरिभाऊ गोखल्यांनी ह्या तुमच्या प्रश्नाचे मोठे चोख उत्तर मागेच, प्रत्यक्ष कृतीने देऊन टाकले आहे. पगार पुरत नाही ना, पगार वाढवून मागू नका. राजिनामे द्या. मंत्री व्हा ! ! ◻

प्रश्न क्रमांक १८५०५ दिनांक २३ ऑगस्ट, १९७३. आमदार श्री. आ. तु. भोसले, शिवडी, मुंबई.

सन्माननीय कामगार मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय ?

१. भारत बॅरल ह्या इंजिनियरींग कारखाना सध्या बंद आहे हे खरे काय ?

२. असल्यास, त्यामुळे अंदाजे किती कामगार बेकार झाले आहेत ? व हा कारखाना पुन्हा सुरू व्हावा म्हणून शासनाने कोणते प्रयत्न केले आहेत ?

**उत्तर : उद्योग व कामगार मंत्री ना. नरेंद्र तिडके.**

१. होय.

२. सुमारे ११०० कामगार बेकार झालेले आहेत. ह्या कारखान्याच्या कारभाराची चौकशी करण्यासाठी भारत शासनाने एक समिती नेमलेली आहे. परंतु समितीच्या कार्यवाहीला दिल्ली हायकोर्टाकडून स्थगिती आदेश मिळाला असून सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

आधी चौकशी समिती म्हणजे किमान एखाद दोन वर्षे. त्यात आता 'प्रकरण न्यायप्रविष्ट आहे'ची भानगड ! म्हणजे एकूण किमान चार पाच वर्षांची तरी निश्चिती ! !

अशी किती प्रकरणे एकट्या मुंबईत आहेत तेही एकदा सहज कुणी सांगितले पाहिजे ! ● ● ●

## मध्यंतर

### जयवंत दळवींचे

# ' सभ्य गृहस्थहो '

पुष्पा भावे

एखाद्या नाटकाचे प्रयोग तुम्हाला हुलकावण्या देत राहातात तसे माझ्याबाबतीत 'सभ्य गृहस्थहो–' चे झाले होते. त्यातून त्या नाटकाच्या पहिल्या प्रयोगापूर्वी खूप जाहिरात झाली असली तरी नंतर मात्र ते नाटक वातावरणात तेवत राहिले नाही. उलटपक्षी वातावरणात दळवींच्या नाटकाविषयी नाराजीच फार होती. त्यातून मीही 'चाळीविषयीचे नाटक' असे त्याचे वर्णन ऐकून उदासीन होते– कारण मराठी विनोदी वाङ्मयातल्या चाळ आणि चाळकरी यांच्याविषयीच्या प्रतिक्रिया आता ठरीव झाल्या आहेत. त्यामुळे नंतर रंगमंचावर झालेल्या 'संध्याछाया'चा प्रयोग आधी पाहिला– तो पाहिल्यावर पुन: 'सभ्य गृहस्थहो–' ची आठवण झाली आणि तो प्रयोग पाहिला.

'बटाटयाची चाळ' 'संभूसांची चाळ' या स्वरूपापेक्षा 'सभ्य गृहस्थहो–' निश्चित वेगळे आहे. जयवंत दळवींच्या मिस्किल 'ठणठणपाळी' व्यक्तीमत्त्वाचा प्रसन्न प्रत्यय देणारे हे विनोदक आहे. येथे चाळीच्या जीवनाचे चित्रण करणे हा हेतू नसून, चाळीच्या जीवनाची चौथी भिंत दूर करणे अधिक स्वाभाविक म्हणून चाळ येते. 'सभ्य गृहस्थहो–' मधला सारा अनुभव सभ्यगृहस्थीखाली दडलेल्या स्त्रीविषयक आकर्षणातून निर्माण होतो. जरा उच्च वर्गातली नीटनेटकी स्त्री दिसली की तिच्यावर नटवी–उठवळ असा शिक्का मारून स्वपावित्र्य सिद्ध करायचे आणि तिच्याकडे चोरून पाहायला मोकळे व्हायचे या मध्यमवर्गीय पापभीरू सभ्यतेचे हे अतिरंजित व्यंगचित्रण आहे. परंतु जयवंत दळवींच्या व्यक्तिविषयक विडंबनाला ज्याप्रमाणे बोचरे टोक क्वचितच असते त्याचप्रमाणे या नाटकातील सामाजिक व्यंगदर्शन तात्पुरते आहे. किंबहुना इतक्याही गंभीर तर्काने या नाटकाकडे पाहायचे नाही– 'ही सारी गंमत' अशी भूमिका घेतल्यास मात्र हे नाटक तुम्हाला आनंद देऊ शकते.

'सभ्य गृहस्थहो–' हे नाटक नेमक्या योग्य दिग्दर्शकाच्या हाती पडले आहे. दामू केंकरे यांना संपूर्ण नाटयकृतीचा तोल सावरणे झकास जमते. 'घेतलं शिंगावर'चा प्रयोग पाहताना हे प्रामुख्याने लक्षात आले असले तरी तत्पूर्वीच 'रहस्य आणि तरुणी' सारख्या प्रयोगात त्यांचे कौशल्य व्यक्त झाले होते. 'सभ्य गृहस्थहो' हे व्यंगनाटय आहे हे त्यांनी पात्रांना दिलेल्या हालचालीतून हलणाऱ्या कठडयाच्या केलेल्या उपयोगातून पार्श्वसंकेत आणि पार्श्वसंवाद

यातून स्पष्ट केले आहे. या नाटकातील प्रमुख भूमिका स्वतः दामू केंकरे आणि रमाकांत देशपांडे यांनी केल्या आहेत. 'वाजे पाऊल आपुले' या नाट्यप्रयोगातील केंकऱ्यांचा अभिनय ज्यांना आठवत असेल त्यांना विनोदी भूमिका उभ्या करण्याच्या त्यांच्या सामर्थ्याविषयी वेगळे सांगायला नको. या नाटकातील लिमयेगुरूजी उभा करताना बायकोच्या वर्चस्वाखाली मलूल झालेले आपले पौरुष सिद्ध करण्याचा यत्न करणारा मध्यमवयीन गृहस्थ त्यांनी मोठा लोभसवाणा भासवला आहे. रमाकांत देशपांड्याची उंची, त्यांचे भिरभिरते डोळे, मजेशीर नाक, हे जात्याच विनोदी भूमिकेला साजेसे आहे. त्यातही विनोदी नाटकात आपले सारे अवयव एखाद्या व्यंगचित्राच्या खोचक रेषेसारखे वापरण्याची त्यांची लकब महाविलक्षण आहे. 'वाऱ्यावरची वरात' मधला जाहिरातवाला 'ससा आणि कासव'मधला शेजारी, 'मना सज्जना' मधला इन्स्पेक्टर या त्यांच्या भूमिकांनी त्यांचे विनोदी भूमिकांचे कौशल्य आधीच प्रस्थापित केलेले आहे. रमाकांत देशपांड्याबरोबर काम करणाऱ्या लता जूकर यांना मी तरी नेहमी गंभीर भूमिकांत पाहिले होते. पण ही व्यंगनाटकातील भूमिका त्यांनी नाट्यशैलीशी समरसून केली. सौ. भडभडे यांनी केलेली लिमयेकाकूंची भूमिका तशी त्यांची नेहमीचीच आहे. अविनाश मसूरेकरांनी यापूर्वी विनोदी नाटकात भूमिका केलेल्या आहेत. गेले वर्षभर गाजत असलेल्या 'तरुण तुर्क' मध्येही ते भूमिका करतात. परंतु आतापर्यंत केवळ लकबी, अविर्भाव यांचा आधार घेणाऱ्या मसुरेकरांना दामू केंकऱ्यांच्या दिग्दर्शनाखाली प्रथमतः शरीर लवचिक करून अभिनय करणे साधले आहे. सभ्य गृहस्थांच्या चौकडीतले चौथे मास्तर विठ्ठल पणदूरकर यांनी उभे केले आहेत. मधू कदम या नटाप्रमाणे विठ्ठल पणदूरकर रंगमंचावरील आपल्या प्रवेशालाच खसखस पिकवू शकतात. त्यांचे तुरूतुरू चालणे, भिवया उडवणे, हात झटकणे या लकबी खरं तर नेहमीच्या आहेत, पण प्रेक्षकांच्या प्रतिक्रियेविषयी अलिप्त राहून ते ज्या सहजपणे अभिनय करतात त्यामुळे त्या लकबी आल्हाददायक वाटतात. गोपीनाथची भूमिका करणारा अजय वढावकरच या नाटकात कमी पडला. परंतु नाटककार आणि दिग्दर्शक यांनी अतिशयोक्तीसाठी वापरलेली दृश्ये फार परिणामकारक ठरली. सर्व पुरुषांनी बनावट पत्राबरहुकूम बाह्या वर सारून, कपाळावर बट काढून उभे राहणे, गॅलरीत पडदे म्हणून लुगडी वाळत घालणे हे दृश्यप्रकार आणि चंद्रिकाबाईंच्या अत्तराचा केलेला वापर मार्मिक होता.

नाटकाचा जीव मात्र मुळात दोन अंकीचा. तो केवळ संकेत म्हणून तीन अंकात बसवला आहे. तरी केंकऱ्यांचे दिग्दर्शन आणि पात्रांचा अभिनय यामुळे प्रयोग रंगत जातो. जुन्या भाषेत सांगायचे तर चार घटका करमणूक म्हणून पाहावयाचे झाल्यास हे एक सत्र विनोदी नाटक आहे. बस्स. इतकेच त्यापेक्षा अधिकाची अपेक्षाच ठेवू नये.

●.● ●

शहादे-तळोदे आघाडी

# आदिवासी बायांचा दारुबंदी लढा

छाया दातार

धुळे जिल्ह्यातील शहादा तळोदे तालुके माणूसच्या वाचकांना आता परिचित आहेत. तेथील आदिवासींच्या चळवळीबद्दल त्यांना सहानुभूती आहे. माणूसतर्फे वेळोवेळी त्यांची गाऱ्हाणी वेशीवर टांगली गेलीं आहेत. माणूसमध्येच तेथील चळवळीविषयी वाचून मी १५ महिन्यापूर्वी शहाद्याला जाऊन आले. त्यानंतर पुनः २२–२३–२४ डिसेंबरला शहाद्याजवळ टेंभे गावी आदिवासी बायांच्या शिबिराला जायची संधी मिळाली. शिबिराच्या दोन तीन दिवस आधी खेड्यावर जाऊन रहाता आले, आदिवासींमध्ये मिसळता आले आणि या १५ महिन्यात चळवळीला आलेला भरघोसपणा लक्षात आला. अडाणी, मागासलेला, दारु पिणारा आदिवासी माणूस म्हणून जागा होण्याची प्रक्रिया जोरदारपणे चालू झाली आहे.

या चळवळीचे एक वैशिष्टय म्हणजे स्त्रीशक्तीचा शोध आणि उपयोग. चळवळीला सुरवात झाली जमिनींच्या प्रश्नाने. लुबाडल्या गेलेल्या जमिनी परत मिळविणे. नुसताच कोर्टदरबारी कर्ज करून वर्षानुवर्ष वाट बघत बसून उपयोग नाही. कोर्टदरबारी कामकाज चालवायला पैसे नाहीत. काही वेळा नुसतेच तोंडी करार झालेले. चारशे रुपये कर्जाच्या बदल्यात १० एकर जमीन पाच वर्षे कसायला दिलेली. पाच वर्षे होऊन गेली तरी जमीन ताब्यात मिळालेली नाही. आदिवासी घाबरून तोंडातून शब्द काढीत नाही. अशा स्थितीत चळवळीने एकजूट साधली. आणि आदिवासी शेतकऱ्यांनी आपल्या शेतात शिरून धान्य कापून जमिनींचा कब्जा मिळविला.

तर नंशेतमजुरीचा प्रश्न आला. बाईला १ रुपया मजुरी आणि पुरुषाला १॥ रुपया मजुरी हा प्रचलित दर होता. बारेद गावी पहिला संप झाला. गावामध्ये ६०% भूमिहीन शेतमजूर आणि गरीब शेतकरी होते. आणि बाया स्वखुशीने संपात सामील झाल्या. त्यांना मजुरी वाढवून पाहिजे होती. प्रश्न त्यांच्या जिव्हाळ्याचा होता. वाटाघाटी चालू होत्या. श्रीमंत शेतकरी आमिष दाखवीत होते. पुरुषमंडळींची थोडीशी चलबिचल होत होती. पण बाया चिवट होत्या. अडून बसल्या. पुरुषांना त्यांनी नैतिक बळ दिले आणि आपल्या मागण्या श्रीमंत शेतकऱ्यांना मान्य करायला लावल्या. बाईच्या मजुरीचा दर १ रुपयाच्या ऐवजी १॥

रुपया झाला. पुरुषाचा २॥ रुपये झाला. पूर्वी १०–१२ तास शेतात काम करावे लागे. आता कामाचे तास ११ ते ५ असे ठरवून मिळाले. बायांच्या सह-कार्याचे महत्त्व कार्यकर्त्यांना कळून चुकले.

जंगल सत्याग्रह झाला. जंगलाची पडीक जमीन भूमिहीन शेतमजुरांना कसायला मिळावी म्हणून जंगलपट्टीतल्या लोकांनी सत्याग्रहाचे अस्त्र उगारले. २ ऑक्टोबर १९७२ ला नांदिया गावा-जवळ ५००–६०० आदिवासी एकत्र जमले आणि त्यांनी जमिनीमध्ये कुदळी चालवल्या. बायाही पुढे आल्या. गवत कापू लागल्या. पोलिसांनी १०० लोकांना पकडले. पोलिस व्हॅन सुरू झाली. बायांनी पुढे येऊन व्हॅन अडविली. त्या रस्त्यावर आडव्या पडल्या. आम्हा-लाही जेलमध्ये घेऊन जा, म्हणून घोषणा देऊ लागल्या. पुनः एकदा बायांचा लढाऊपणा लक्षात आला.

मोड गावी ग्रामपंचायतीच्या जागे-मध्ये श्रीमंत शेतकऱ्यांची खळी आहेत. ती भूमिहीनांना कसायला मिळावीत म्हणून औतं घालविण्याचा कार्यक्रम घेण्यात आला होता. सहा पोलिस व्हॅन्स हजर होत्या. पुनः एकदा बायांनी अभूतपूर्व शौर्य दाखविले. १५० पुरुष आणि ५० बायांना अटक झाली. आम्हाला खायला देऊ शकत नसाल तर अटक तरी करून न्या. अशा त्यांच्या घोषणा होत्या. पूर्वी सरकारी अधि-काऱ्याला, पोलिसाला घाबरून पळ-णारी ही बाई आज पोलिसांच्या लाठ्या खायला पुढे जात होती.

## घरीदारी शोषण

या सगळ्या प्रसंगातून पुनः पुनः लक्षात येत होते आदिवासी शेतमजूर आणि गरीब शेतकरी पुरुष तर चळ-वळीमध्ये मोठ्या प्रमाणात सामील होत होताच, पण आदिवासी बायांचा उत्साह अधिक उत्स्फूर्त होता, कळ-कळीचा होता. याचे कारण काय? तर आदिवासी स्त्रीचे तीन पातळ्यांवर शोषण होत होते. शेतमजुरी कमी देऊन तिचे आर्थिक शोषण होत होते. सधन शेतकऱ्याचा मुलगा श्रीमंतीच्या गुर्मी-मध्ये कधी तिचा उपभोग घेत होता. कधी तिच्या जमातीचाच मुलगा मना-विरुद्ध तिला पळवून नेत होता तर कधी तिचा नवरा दारूच्या नशेत तिला मारीत होता. सट्टा खेळून पैसा उधळून टाकीत होता. म्हणजे तेथील स्त्री अधिक दडपलेली होती. घरीदारी पिचली जात होती. चळवळीने जणू वर्षानुवर्षांच्या तिच्या दुःखाला वाचा फोडली. आशेचा नवा किरण दाखविला. कोंडलेली वाफ बाहेर आली. तिच्या जीवनाला अर्थ दिला. तिला आर्थिक स्वातंत्र्य होते. ती मजुरी करून पैसे मिळवीत होती. पण रूढींनी, परंपरांनी बांधली गेली होती. संपामध्ये भाग घेऊन, मोर्चामध्ये भाग घेऊन तिला आत्मविश्वास आला, आपल्या शक्तीचा प्रत्यय आला. ती बोलू लागली. ताठमानेने वावरू लागली.

स्त्रियांमधील ही जागृती ओळखून कार्यकर्त्यांनी १८ एप्रिल १९७२ रोजी खरवड येथे स्त्रियांचा मेळावा भरविला. शहाद्याच्या इतिहासात याला फार मोठे

स्थान राहील. गावोगावच्या स्त्रिया एकत्र आल्या. सभेत उभे राहून बोलल्या. एकमेकींशी ओळख करून घेतली. एकजूट पक्की केली. आतापर्यंत चळवळीमध्ये मला भाग घ्यावासा वाटायचा पण भीती वाटायची. नातलक काय म्हणतील, जमातीचे लोक काय म्हणतील. पण जेव्हा तिने पाह्यले गावोगावी आपल्यासारख्याच बऱ्याच बाया याच विचाराने प्रेरित झाल्या आहेत तेव्हा नात्याची बंधने झुगारायची तिची मानसिक तयारी झाली. तिला नवीन सगेसोयरे मिळाले. नातलगामध्येही तिने या नवीन विचारांचा प्रचार करायला सुरुवात केली. या मेळाव्याचे वैशिष्टच म्हणजे दारुबंदीचा कार्यक्रम हाती घ्यायचा सर्वांनी निर्धार केला.

त्याच्या पुढची पायरी म्हणजे २२–२३–२४ डिसेंबरला टेंभे येथे भरलेले शेतमजूर बायांचे हे शिबीर. १०० बाया (येथे बायका शब्द वापरणे वाईट समजतात. बाया म्हणजे स्त्रिया) शिबिराला आल्या होत्या. साधारणपणे प्रत्येक गावच्या दोन ते तीन बाया होत्या. टेंभे गावच्या लोकांनी जेवणाखाण्याची सर्व व्यवस्था करण्याचे मान्य केले होते. एका मोठ्या गोदामामध्ये रहाण्याची सोय होती. जवळच सुंदर सारवलेले खळे होते. गाव जेमतेम १५०० लोकवस्तीचे. वीज नाही. तापी नदीच्या काठावर वसलेले. त्यामुळे पाण्याची कमतरता नव्हती. गावोगावाहून धान्य जमवले होते. मुंबईच्या महिलांनी आर्थिक मदत पाठविली होती. त्यामुळे भाज्या, तेल, चहा, गुळाचा खर्च भागविला गेला.

दोन दिवस अभ्यास, चर्चा, भाषणे असा कार्यक्रम होता. जगाचा मोठा नकाशा मोठ्या कापडावर रंगवून भिंतीवर लावला होता. शहर म्हणजे काय, शहरातील उंच इमारती आणि जवळचीच गलिच्छ झोपडपट्टी, मोठाले कारखाने, यंत्रे, एकत्र काम करणारे हजारो कामगार, खाणी, लोखंडाचे उत्पादन वगैरे गोष्टींची चित्रे जमवून त्यांचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. आश्चर्य म्हणजे तीन तीन तास बाया भाषणे ऐकत बसत होत्या. २०–२० बायांचा एकेक गट असे पाच गट केले होते. बाया आपापल्या गटात चर्चा करीत होत्या. प्रश्न विचारीत होत्या. सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे लिहायला वाचायला शिकलेली एकही बाई नव्हती. साधारणपणे ५० तरुण मुली होत्या. ३० मध्यमवयीन बाया आणि २० उतारवयातल्या बाया असे प्रमाण होते. सरकार म्हणजे काय, सरकारची वेगवेगळी खाती कोणती, त्यांची कामे काय, कामगारसंघटना कशा असतात, कामगारांसाठी कसे कसे कायदे होत गेले, त्यांचे काम कसे चालते वगैरे माहिती दिली गेली. रोज सकाळी कवायत घेतली. सर्वांगसुंदर व्यायामाचे प्रकार शिकविले. कधीही शाळेत न गेलेल्या त्या मुलांना त्याची फार अपूर्वाई वाटली—

२४ तारखेला समारोप होता. तारा रेड्डी, मृणाल गोरे, गोदूताई परुळेकर यांनी यायचे कबूल केले होते. त्यापैकी

फक्त तारा रेड्डी आल्या. बाकी दोघी येऊ शकल्या नाहीत. त्यांनी बायांच्या एकजुटीचे आणि उत्साहाचे कौतुक केले.

## दारूबंदीचे लढे

मात्र शिबिरातील सगळ्यात आकर्षक भाग होता बायांनी आपल्या गावी दारूबंदीचे लढे कसे दिले याची दिलेली माहिती. बायांची भाषणे फार जिवंत असायची. खरवडच्या मेळाव्यानंतर बायांनी ठरवले, आपल्या गावी दारू-गाळायला परवानगी द्यायची नाही. प्रत्येक गावी दहाबारा बाया एकत्र जमल्या. हातात काठ्या घेऊन दारूच्या गुत्त्यावर गेल्या आणि भराभर मडकी फोडायला सुरुवात केली. काही ठिकाणी बायांनी शेजारच्या गावच्या बायांना सांगावा पाठविला आणि त्याही स्त्रिया यांना सामील झाल्या. आपली फळी त्यांनी भक्कम केली आणि मोठा मोर्चा काढून त्या गुत्त्यावर गेल्या. ज्या ठिकाणी त्यांना थोडा प्रतिकार झाला तेथे तरुण मंडळांनी त्यांना साथ केली. जेथे दारुडा माणूस दिसला त्याच्या-भोवती बायांनी फेर धरून दारुबंदीची गाणी म्हटली आणि परत दारू पिणार नाही म्हणून कबुली घेतली. एका ठिकाणचा पोलीस पाटील ऐकेचना! 'तुम्ही कोण मला शिकवणार!' त्याने प्रश्न विचारला तावडतोब बायांनी त्याचे हातपाय बांधले. विचारा गयावया करायला लागला. तेव्हा त्याला शिक्षा फर्मावली. गावातल्या सगळ्या बायांच्या पाया पड आणि महाशयांनी सगळ्यां-पुढे नाक घासले. गावोगावी बायांनी एवढी जरब उत्पन्न केलीय् की यंदा दिवाळीला बऱ्याच गावांनी शपथा घेतल्या आणि सबंध गाव दारूतून मुक्त करण्याची ग्वाही दिली.

बायांनी केलेली दारुची गाणी तर फारच गंमतीशीर आहेत. चळवळीला आलेले ते बाळसेच म्हणावे लागेल.

> भट्टीवर जाऊन जाऊन
> मित्र केले चार बाई
> दारुची बाटली
> फार मजेदार बाई ।। ध्रु० ।।
> खेती होती
> ती भी गेली
> नांगर ठेवायची
> तय्यारी बाई ।।

अशी घरादारातील एकेक वस्तू जात जात शेवटी बाई म्हणते.

> घर होते
> ते भी गेले
> बायको ठेवायची
> तय्यारी बाई ।।

शेवटी बायको गहाण ठेवायची पाळी येते. हे अनुभवाचे बोल. दुसऱ्या एका गाण्यातून आदिवासी बाईचा स्वतंत्र बाणा जाणवतो.

> किती रावण्या
> करू मी घराघरी
> घराघरी आता तरी
> सोडा तुम्ही दारु तरी ।।
> तुझा बाप मले पैसा
> देतो की नोटा देतो
> माझे माझे कष्ट करूनी
> ी ।।

गाणी हे आदिवासी जीवनाचे फार महत्त्वाचे अंग आहे. आणि या चळवळीतून अनेक नवी गाणी तयार झाली आहेत. आणि सर्व बायांच्या ती तोंडावर आहेत. सामुदायिक गाण्याचा अनुभव एकजुटीचा विलक्षण अनुभव देतो. उंच आवाजात घोषणा देणे हेही बायांना फार आवडायचे. यावेळच्या काही नवीन घोषणा फार प्रत्ययकारी होत्या.

**बाई कोणाची नाही मालमत्ता**
**आमच्या हाती आमची सत्ता**

दुसरी भिल्लोरी भाषेतील घोषणा होती.

**बायामाणसांनी जुग जोये**
**न्याय जाये तो लढा जेत्ये**

(जुग=एकी)

स्वर, ताल हे जणू त्यांना उपजतच असते. रात्री सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये बायांनी लग्नाच्या वेळी करायचे सामुदायिक नृत्य करून दाखविले. शहरी बायांना नाचता येत नाही म्हणून त्या चिडवू लागल्या. आणि आम्ही शहरी मुलींनी झिम्म्माचा फेर धरला. गोफ विणला. आणि त्या बायांना खूप आनंद झाला.

शिबीर संपतांना पुढे काय याची अष्टसूत्री सांगितली गेली.

१ : कोणाही बाईने तोंडावर पदर घेऊन लाजत पाठीमागे बसायचे नाही.

२ : ताठ मानेने चालायचे.

३ : आपल्या गावी बायांची समिती स्थापन करायची,

४ : समितीतर्फे दारुबंदीचा व जुगारबंदीचा कार्यक्रम हाती घ्यायचा.

५ : 'झगडा तोडणे' या प्रकारासाठी बायांची पंचकमिटी बसवायची.

६ : रात्रीच्या शाळेत जायचं. लिहायला वाचायला आलेच पाहिजे अशी प्रतिज्ञा करायची.

७ : शिबिरातून गेल्यावर आपण जे शिकलो ते सर्वांना समजावून सांगायचं.

८ : तरुण मंडळांच्या कार्यक्रमांमध्ये भाग घेऊन सहकार्य करायचे.

यापैकी 'झगडा तोडणे' हा प्रकार गंमतीचा आहे. एखादा तरुण एखाद्या तरुण मुलीला पळवून नेतो. गावचे लोक जाऊन त्यांना शोधून आणतात. तरुण मुलाने ३०० रु. मुलीच्या बापाला देऊन मुलीशी लग्न करावे आणि एवढे पैसे नसतील किंवा मुलीशी लग्न करायची तयारी नसेल तर पंच कमिटी सांगेल तेवढे पैसे दंड म्हणून भरावे ही पद्धत. हे पंच सगळे पुरुष असतात. त्यांचा डोळा पैशावर व मेजवानीवर असतो. दंडाची रक्कम त्यांना मिळते. अशीही उदाहरणे घडतात की, त्या मुलीला दिवस गेले आहेत. तेव्हा बातमी उघडकीस येते. ती मुलगी गर्भपाताचा प्रयत्न करते. तिला खरे म्हणजे डॉक्टरकडे घेऊन जाण्याची गरज असते. पण पंचांच्या परवानगीवाचून तिला घेऊन जाता येत नाही. बिचारी तळमळत रहाते. पंच लोक पैशाच्या वाटाघाटी करतात. ह्याला झगडा तोडणे म्हणतात. त्यानंतर मुलगा व मुलगी स्वतंत्रपणे लग्न करू शकतात. मुलगी अपवित्र होत नाही. ह्यासंबंधी हल्ली त्या भागात बरेच लोकमत जागृत होत आहे.बायांची पंच कमिटी बसली की मुलीचा अधिक

सहानुभूतीने विचार होईल अशी कल्पना आहे.

सर्व बायांनी एकमुखाने ह्या कार्यक्रमाला मान्यता दिली.

शिबिराला आलेल्या शेतमजूर बाया आणि आम्ही शहरातील मुली, बायका, आम्हा सगळ्यांनाच हे शिबिर हा एक विलक्षण अनुभव होता. आम्ही त्यांच्या बरोबर जाड जाड बाजरीच्या भाकरी खाल्ल्या. लाल लाल तिखट रस्सा डोळ्यातल्या पाण्याबरोबर संपवला. त्यांना शिकवलं आणि त्याहीपेक्षा आम्ही खूप शिकलो. प्रत्यक्ष जीवन जवळून पाहिलं. माणसामाणसांचे संबंध जवळून बघितले. आमची सामाजिक जाणीव आणि कष्टकऱ्यांची सामाजिक जाणीव यातील तफावत लक्षात आली. जनशक्तीचा प्रत्यय आला. एकजुटीचा अर्थ कळला. एकजूट करून लढाऊ कार्यक्रम हाती घेतल्याखेरीज या समाजातील सगळ्यात तळच्या थरातील लोकांच्या मागण्यांची दाद घेतली जाणार नाही हेही लक्षात आले. त्यांना आज दानधर्माची गरज नाही आहे. त्यांना आज निर्भय बनण्याची गरज आहे. आत्मविश्वास निर्माण होण्याची गरज आहे. आपल्या हक्कांची क्रांतिकारी जाणीव निर्माण होण्याची गरज आहे आणि तेथील बायांच्या लक्षात आलंय, दारू आपल्या एकजुटीच्या मार्गातील धोंड आहे. दारूमुळे आज शेतमजूर पुरुष अन्याय विसरतो. दुःख बुडवून टाकतो. पशू बनतो. जुन्या चालीरीतीमुळे स्त्री दबली रहाते. बंधनात रहाते. म्हणून तेथील बाया आज पुढे आल्या आहेत. करडे गावच्या रुलाबाईचा नवरा मेला मागच्या वर्षी. पोटी दोन छोटी पोरे. तरुण वय. पण ती चळवळीत सामील झाली. माडेगावची बंजाबाई, वारेदची बन्सीबाई, गौंडाळचाची भुरीबाई सगळ्या आज डोळ्यासमोर दिसताहेत. तळमळून बोलताहेत. पण आज त्या अगतिक नाही आहेत. हताश नाही आहेत. त्यांना माहितीय्, एक दिवस हे सगळं बदलणार आहे आणि ते आपण बदलायचंय्.

एक गोष्ट निश्चित, या शिबिराचा ठसा हा एन. एस. एस. च्या कुठच्याही श्रमदान शिबिरापेक्षा जास्त होता. येथे नुसता मातीशी संबंध नव्हता. तर दररोज मातीत काबाडकष्ट करणाऱ्या कष्टकरी बायांच्या मनाशी संबंध होता.

● ● ●


# फिडेल, चे आणि क्रांती

**अरुण साधू । मूल्य : सात रुपये । राजहंस प्रकाशन**

मुक्काम पुणे

# बातमीदारीतील किस्से

मधुकर प्रभुदेसाई

**शनिवार तारीख पाच जानेवारी :**

रात्रीचे साडेनऊ वाजलेत. 'साधना' कार्यालयातील आंतरभारती सभागृहात पुण्याची वार्ताहर मंडळी जमू लागली. पण येथे 'पत्रकार परिषद' वगैरे काही नव्हते. ही सभा होती फक्त वार्ताहरांची. बातम्या मिळविताना आलेल्या अनुभवांचे किस्से पत्रकार दिनानिमित्त एकमेकांना ऐकविण्यासाठी ते एकदम जमले होते. प्रत्येक जण आपले अनुभव सांगत होता आणि इतर वार्ताहर हास्यकल्लोळात त्याची दाद देत होते. अध्यक्षस्थानी होते 'केसरी'चे मुरब्बी बातमीदार श्री. वि. स. माडीवाले. नेहमी सगळीकडे टिपणे घेणारे आणि कमी बोलणारे हे पत्रकार आज दिलखुलासपणे बोलत होते. एकेक जण आपले अनुभव सांगत होता.

सुधाकर अनवलीकर त्यावेळी 'सकाळ'मध्ये आणि प्रधान 'केसरी'त होते. खास बातमी देऊन एकमेकावर मात करण्यात त्यांची चुरस असायची. एकदा अनवलीकरांनी अशीच एक खास बातमी मिळविली आणि 'ती उद्याच्या अंकात वाच' असे प्रधानांना सांगितले.

त्या दिवशी रात्री अनवलीकरांना नेहमीप्रमाणे ज. पां. देशमुखांचा फोन आला. अनवलीकरांनी त्या दिवशीच्या इतर सर्व बातम्यांबरोबरच या खास बातमीचा उल्लेख करून ती बातमी संपूर्ण वाचून दाखविली. 'ती बातमी देऊ नका. तिचे काय करायचे ते मी उद्या सांगतो.' हा देशमुखांचा हुकूम ऐकल्यावर अनवलीकर मनातून खूप चरफडले. पण करता काय ?

दुसऱ्या दिवशी ती खास बातमी 'केसरी'त छापून आल्यावर अनवलीकर थक्क झाले. खरा प्रकार असा होता. देशमुखांच्या आवाजाची नक्कल करून प्रधानांनी ती बातमी अनवलीकरांकडूनच मिळविली होती. पण हा प्रकार येथेच थांबला नाही. दुसऱ्या दिवशी रात्री खरोखरच देशमुखांचा फोन आला. 'मी देशमुख बोलतो आहे' हे ऐकल्याबरोबर अनवलीकरांनी त्यांना प्रधान समजून फोनवर चक्क शिव्या घालल्या आणि फोन बंद केला. नंतर

मात्र ' आपण तो फोन घेतलाच नव्हता ' असे म्हणण्याशिवाय अनवलीकरांना गत्यंतर नव्हते.

हा किस्सा सांगितला ' सकाळ 'चे सहसंपादक श्री. द्वारकानाथ लेले यांनी. श्री. लेले ' समाचार भारती ' या वृत्त-संस्थेत असताना त्यांनी दिलेल्या एका बातमीमुळे चांगलेच गोत्यात आले होते. १९७० साली पुण्यात एस. एम. जोशी उपोषणास बसले होते. रात्री केव्हातरी ते रामभाऊ म्हाळगी आणि श्रीकृष्ण भिडे यांच्याशी गप्पा मारीत असताना यशवंतराव चव्हाण आणि बा. न. राजहंस यांच्या दिल्लीतील फोनवरील बोलण्याचा उल्लेख त्यांनी केला. योगा-योगाने यावेळी द्वारकानाथ लेले एस. एम. जवळ होते. ' उपोषण कसले करता, ताकद कमावून लढायला या ' असे चव्हाणांनी म्हटल्याचे राजहंस यांनी एस. एम. ना सांगितले. हे कानावर पडताच लेले एक खास बातमी मिळा-ल्याने खूश झाले. दुसऱ्या दिवशी ही बातमी छापून आल्यावर चव्हाणांनी तिचा इन्कार केला. शेवटी हे प्रकरण आपल्या अंगावर शेकल्याचे पहाताच लेले म्हाळगींकडे गेले आणि त्यांच्या-कडून एस. एम. ' तसे ' बोलले अस-ल्याचे त्यांनी लिहून घेतले. तात्पर्य. पुढारी बोलतात ते सर्वच छापण्यासारखे नसते.

¤

बातमीदारांना केवळ बातमी घेण्या-साठीच जावे लागते असे नाही. काही वेळेस एखाद्या समारंभाचे वक्ते, अध्यक्ष या नात्यानेही जावे लागते. प्रभातचे चंद्रकांत दीक्षित यांना गांधी जन्म-शताब्दीनिमित्त पुण्याजवळील एका गावी वक्ते म्हणून येण्याची गळ घातली गेली. कारण समारंभाच्या आयोजकांना दुसरा कोणीही वक्ता मिळत नव्हता. ' सभेला अध्यक्षही मिळवून द्या ' अशी विनंती केल्यावर दीक्षितांनी द्वारकानाथ लेले यांचे नाव अध्यक्ष म्हणून सुचविले. आयोजकांना ते मान्य झाले. नंतर प्रत्यक्ष सभेच्यावेळी या आयोजकांनी दीक्षित आणि लेले या दोघांचीही रेवडी उडवली. ' आजच्या सभेस वक्ते आणि अध्यक्ष म्हणून या अशी विनंती मुख्य-मंत्र्यांना केली पण कोणालाच वेळ नव्हता. खासदार, आमदार या-पैकीही कोणी मोकळे नव्हते. पुण्यात सगळ्या नामवंतांना विनंती केली, पण त्यांनाही कोणास वेळ नव्हता. शेवटी सभा व्हायलाच हवी म्हणजे कोणीतरी वक्ते हवेत, अध्यक्ष हवेत, तेव्हा म्हटले चला दीक्षित तर दीक्षित ! आता राहिले अध्यक्ष ! तेही सापडले असेच एक लेले ! ' हे प्रास्ताविक ऐकल्यावर दीक्षितांची आणि लेले यांची स्थिती काय झाली असेल याची कल्पनाच केलेली बरी !

¤

पुण्यात ऐकेकाळी वसत सणस–कुसूम देशपांडे प्रकरण वृत्तपत्रातून गाजले होते. ही केस कोर्टात उभी राहिली. एका तारखेस त्या केसची सुनावणी होती आणि त्याच दिवशी एका सत्याग्रह खटल्याचा निकाल होता.

सध्या ' विशाल सह्याद्री ' चे बातमीदार श्री. गोपाळ पटवर्धन कोर्टात गेल्यावर त्यांच्या एका वार्ताहर मित्राने सणस–देशपांडे केस सुनावणीस निघालीच नाही अशी माहिती पुरविली आणि या खटल्याची बातमी पटवर्धन यांना मिळू नये म्हणून शेवटपर्यंत त्याने पटवर्धनांचा पिच्छा सोडला नाही. सत्याग्रहाच्या खटल्याच्या निकालाची तपशीलवार नोंद घेतल्यावर पटवर्धन निघून जातील अशी त्या वार्ताहराची अपेक्षा मात्र फोल ठरली. कारण लगेचच पटवर्धनांनी ' आता आपण सणस देशपांडे प्रकरण पाहू ' अशीच सुरुवात केली.

¤

प्रा. मा. का. देशपांडे यांची एका सरकारी समितीवर कशी नेमणूक झाली त्याची हकीकत ' केसरी 'चे श्री. जावडेकर यांनी सांगितली. बोरीवलीचे आमदार एम. के. देशपांडे त्यावेळी टिळक रोडवरील ' जीवन 'मध्ये उतरले होते. त्या समितीवर नेमणूक केल्याचे पत्र आमदार देशपांडे यांना जायचे ते ' एम. के. देशपांडे, टिळक रोड, पुणे ' असा पत्ता लिहिल्यामुळे प्रा. मा. का. देशपांडे यांच्याकडे गेले आणि मा. का. देशपांडे यांनी लगेचच समितीवर सदस्य म्हणून काम करण्यास आपण तयार असल्याचे कळवूनही टाकले. ही हकीगत जावडेकरांना समजल्यावर या बातमीची चौकट त्यांनी ' काळ 'मध्ये टाकली. दुसऱ्या दिवशी मा. का. देशपांडे तणतणत ' काळ ' कचेरीत आले. त्यावेळी जावडेकरांनी त्यांना ' तुमचे नेमणूक पत्र ज्या पाकिटातून आले ते पाकीट आणा म्हणजे या बातमीचा खरेखोटेपणा सिद्ध होईल ' असे सांगितल्यावर देशपांडे परत फिरकले नाहीत.

¤

श्री. दामुअण्णा कोकजे ' ज्ञान प्रकाश ' मध्ये होते तेव्हाचे काही किस्से त्यांनी ऐकविले. एकदा ससून हॉस्पिटल रस्त्यावरून जाताना बंदुका घेतलेले आणि बुटावर धुळीचा थर साचलेले काही पोलीस रस्त्याने धावत जाताना दिसले. कोकजे यांनी मोठ्या कौशल्याने ते पोलीस एका दरोडेखोराच्या टोळीच्या मागावर होते ही माहिती काढली. त्या दरोडेखोरांच्या टोळीतील काही जखमींना ससूनमध्ये ठेवले असल्याचे कळताच कोकजे ससूनमध्ये गेले आणि त्यापैकी एकाकडून दरोड्याची सविस्तर माहिती मिळवून त्यांनी ती छापली. तो दरोडेखोर कोकजे यांच्याशी बोलल्यावर तासा-दीड तासाने मेला. तेव्हा कोकजे यांनी घेतलेल्या त्या मुलाखतीला नंतर कोर्टाने त्या दरोडेखोराच्या मृत्यूपूर्व जबानीइतके महत्व दिले. कारण पोलिसांना मृत्यूपूर्व जबानी घेता आली नव्हती.

¤

महात्मा गांधींचे चिरंजीव रामदास व चक्रवर्ती राजगोपालाचारी यांची कन्या लक्ष्मी यांच्या विवाहाचे वेळी बातमीदारांना तेथे येण्यास मज्जाव केला होता. सर्व बातमीदार खालीच बसून होते. तेवढ्यात पद्मजा नायडूंच्या

कन्या बाहेरून तेथे आल्या. आजारपणामुळे त्यांना माडीवर विवाहस्थळी जाता येईना. तेव्हा कोकजे आणि त्यांचे मित्र यांनी एक खुर्ची आणली. आपण बातमीदार आहोत याचा सुगावाही न लागू देता नायडूंना खुर्चीत बसविले. आणि ती खुर्ची उचलून वर नेली. त्यांच्या या सौजन्यामुळे नायडूंना आनंद वाटला. कोकजे आणि त्यांचे मित्र यांनी विवाहाचा संपूर्ण सोहळा तेथे खुर्चीजवळ बसून पाहिला. कोणालाही त्यांचा संशय आला नाही. दुसऱ्या दिवशी विवाहाचे संपूर्ण वर्णन वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाले !

¤

श्री. वि. स. माडीवाले यांच्या एका मित्राला बातम्यांची टिपणे आणि संपादकांच्या सूचना कागदावर लिहून ठेवण्याची सवय होती. एकदा माडीवाले यांनी त्यांच्या खिशातला कागद हळूच काढला. त्यावर 'रास्ता पेठेत अमुक एका गृहस्थाकडे कुत्रा-कुत्रीचे लग्न-बातमी कव्हर करा' अशी सूचना होती. तो कागद वाचून माडीवाले यांनी परत मित्राच्या खिशात ठेवून दिला. थोड्या वेळाने 'आज काय विशेष बातमी ?' असे विचारल्यावर 'काही नाही' असे उत्तर माडीवाले यांना मिळाले.

आपली ही खास बातमी असल्याने आणि ती दुसऱ्या कोणास माहित नाही असा समज झाल्याने त्या वार्ताहराने 'ती उद्या द्यावी' असा विचार केला. माडीवाले मात्र त्याच बातमीच्या मागे लागले आणि दुसऱ्या दिवशीच्या अंकात ती सविस्तर दिली. तेव्हा 'ही खास बातमी तुला कशी काय मिळाली बुवा' असे त्या वार्ताहराने विचारताच माडीवाले म्हणाले, 'मला काय माहित ती तुझ्याकडेही होती म्हणून ? काल विचारले, तेव्हा तू काही बोललाच नाहीस. नाहीतर दिली असती तुला !,

¤

गोवा मुक्तीनंतर ताबडतोब सुमारे ८० वार्ताहर गोव्यात गेले. पण तिथून तारा, टपाल पाठवायची काहीच सोय नव्हती. म्हणून सर्वजण 'फेणी'च्या नादात गुरफटले. माडीवाले यांनी मात्र भली मोठी तार लिहिली आणि पोस्टात 'तारा करताच येत नाहीत' हे उत्तर ऐकल्यावर माडीवाले म्हणाले, मग सरकारी टपाल कसे जाते ?' 'हेलिकॉप्टरने' इति पोस्टमास्तर. 'मग त्याबरोबर ही तार रवाना करा' असे म्हणताच पोस्टमास्तरने 'ती तार न गेल्यास तुम्ही मला जबाबदार धराल म्हणून मी ही तार घेणार नाही, असे उदगार काढले. तेव्हा माडीवाले यांनी पोस्टमास्तरला विश्वासात घेतले. 'तार तुम्ही बेळगावला पाठवा. ती गेली तर ठीकच. न गेली तर मी तुम्हाला विचारणार नाही' असे म्हटल्यावर तार स्वीकारली गेली. 'केसरीत' साडे चार कॉलम मजकूर प्रसिद्ध झाला. आणि मग इकडे इतर बातमीदारांची 'फेणी' उतरली. माडीवाले सांगत होते.

¤

दादासाहेब गायकवाड यांचे निधन

झाल्यावर त्या संबंधीची प्रतिक्रिया एका मंत्री महाशयांना दिक्षितांनी विचारली. प्रतिक्रिया सांगितली असती हो पण मला आता वेळ नाही. असे कराना, तुम्हीच लिहून काढा आणि मला वाचून दाखवा !' दिक्षितांनी प्रतिक्रिया लिहिली आणि मंत्री महाशयांना वाचून दाखविली. वा ! छान ! आता असे करा सगळ्या पेपरांना देऊन टाका ती !'

दिक्षितांनी आणखी एक फोन केला. एका अखिल भारतीय पक्षाच्या अध्यक्षांना. 'दादासाहेब गेले या वार्तेनेच माझे डोळे भरून आले आहेत. कंठ दाटून आला आहे. असे कराना, तुम्हीच माझ्या तोंडी दोन चार चांगली वाक्ये प्रतिक्रिया म्हणून टाका झालं !!'

□

पुणे म्युनिसिपालिटी असताना एका मंत्री महोदयांचा सत्कार व्हायचा होता. त्यावेळी म्युनिसिपालिटीच्या अध्यक्षांना स्वागतपर भाषण करायचे होते. अध्यक्षांनी माडीवाले यांच्याकडून भाषण लिहून घेतले. माडीवाले यांनी अध्यक्षांची भाषण करण्याची कुवत ओळखून अगोदर त्या भाषणाची रंगीत तालीमही करून घेतली. समारंभ सुरू झाला. अध्यक्ष महाशय भाषण करीत होते. म्हणजे वाचून दाखवित होते. 'XXX यांनी **परस्त्रीशी** झगडा करून मंत्रीपद मिळविले' हे वाक्य अध्यक्षांनी उच्चारताच माडीवाले, मंत्री यांच्या सकट सारे सभागृह थक्क झाले. वस्तुतः ते वाक्य 'XXX यांनी परिस्थितीशी झगडा करून मंत्रीपद मिळविले' असे होते.

□

'सकाळ'चे त्यावेळचे बातमीदार मधुकर प्रभुदेसाई यांनी आपल्या दोन आठवणी सांगितल्या. एकदा कै. स. गो. बर्वे मंत्री असताना पुण्यात एका बँकेच्या उद्‌घाटनानंतर पत्रकारांना 'पूनम'मध्ये चहापान होते. बर्वे नियोजन मंडळावर जाणार ही बातमी खरी असल्याचे बर्वे यांनीच त्यावेळी सांगितले. तेव्हा 'ही बातमी नाही. तू काही देवू वगैरे नकोस. अशा बातम्या द्यायच्या नसतात' असे अत्यंत गंभीर चेहऱ्याने एका पत्रकार मित्राने त्यांना सांगितले. ते एकेकाळचे सहकारी असल्याने प्रभुदेसाई यांनी त्या सांगण्यावर विश्वास ठेवला. दुसऱ्या दिवशी 'सकाळ' सोडून सर्व पत्रात ही बातमी पहिल्या पानावर आली.

पुणे जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष आणि 'साधना'चे संपादक श्री. यदुनाथ थत्ते यांनीही आपण बातमीदारी क्षेत्रात कसा प्रवेश केला ते सांगितले. 'मराठा'चे प्रतिनिधी श्री. मधुकर जोशी यांनी आयुर्वेद रसशाळा प्रकरणासाठी कोणत्या धमक्यांना, दडपणांना तोंड द्यावे लागले त्याचे खुमासदार वर्णन केले.

'पूना हेरॉल्ड'चे वार्ताहर कै. बाबा घोरपडे यांना सभेच्या सुरवातीस श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यांच्या काही आठवणी श्री. माडीवाले यांनी सांगितल्या.

सुमारे अडीच तास चाललेला हा कार्यक्रम चहापानानंतर रात्री बारा वाजता संपला.

मधुकर प्रभुदेसाई

# अशनि संकेत

## एक फसलेला चित्रपट

अशोक राजवाडे

सत्यजित रायच्या 'पथेर पांचाली'ने भारतीय चित्रपटांच्या क्षेत्रात एक नवे युग सुरू केले. पथेर पांचालीची कलात्मकता ही केवळ तांत्रिक पातळीवरच नाही तर तिच्यात एक नष्ट होणाऱ्या जीवनपद्धतीचा नव्याने आणि तटस्थपणाने शोध घेण्यात आला आहे. खेडेगावातले परंपरागत जीवन ढासळून पडताना, म्हणूनच प्रेक्षक भावनाविवश होऊन सुन्न होत नाही तर तो अंतर्मुख होतो. इतिहासाच्या प्रक्रियेचा हा अटळ क्रम म्हणून तो या घटनांकडे पाहतो. चित्रपटाच्या उत्तरार्धात आगगाडीच्या टेलिफोनच्या खांबांच्या रूपात आप्ल्याला नवे जग भेटत असते; आणि त्याच वेळी या परंपरागत जीवनाला तडे जात असतात.

सत्यजित बाबूंनी पथेर पांचाली नंतरही अनेक चित्रपट काढले आणि यातल्या प्रत्येक चित्रपटात कलात्मकतेचे भान ठेवीत असतानाच त्या त्या परिस्थितीतल्या सामाजिक, कौटुंबिक, वैयक्तिक तणावांना आकार दिला. अगदी 'प्रतिद्वंद्वी' सारख्या अलिकडच्या चित्रपटामध्येही हे पैलू दिसून येतात.

'अशनि संकेत' हा चित्रपट पहायला जाताना हे सर्व काही सापडेल अशी आशा होती. आणि सत्यजित रायबद्दल आपण ज्या अपेक्षा ठेवून चित्रपट पाहायला जातो त्या अपेक्षादेखील काही छोटया नसतात.

या चित्रपटाची कथा विभूतिभूषण वंदोपाध्याय यांची आहे. कथेचे स्थळ आहे बंगालमधील एक खेडे. भारतातल्या खेडयासारखेच शांत, गतिहीन, त्यातही निसर्गरम्य. गंगाचरण चक्रवर्ती हा तिथे राहायला आलेला असतो. आपले पहिले गाव सोडून! कारण पूर्वीच्या गावी पाण्याचे दुर्भिक्ष आहे. या खेडेगावात आल्यानंतर तिथे पोटापाण्याला काही मिळावे म्हणून पहात असतो. म्हणून खेडेगावात शाळा उघडण्याचा आणि जोडीला गावाचे पुजारीपण करायची इच्छा असते. त्याची बायको अनंगा ही (सत्यजित रायच्या इतर नायिकाप्रमाणेच) शांत, बोलक्या डोळयांची, भावुक आणि मुख्य म्हणजे सुंदर गृहिणी आहे. तिच्यामुळे गाव आता अधिक उजळ दिसते आहे असे तिच्या शेजारणी तिला म्हणत असतात.

महायुद्ध चालू झाल्याची बातमी—नव्हे कुणकुण—ऐकू येत असते. सिंगापूरचा ताबा जपानी लोकांनी घेतल्याचे कोणीतरी बोलतो. हळूहळू लोकांना ते कळू लागते. कारण बाजारातून रॉकेल गडप होते. तांदळाचे भाव भरमसाट वाढू लागतात. रोगराई वाढू लागते. मापटेभर तांदूळ मिळवण्यासाठी अनंगाला मधूनमधून भात सडण्याचे काम करावे लागते. बाजारात गडबड सुरू होते. एके दिवशी तांदळाची लुटालूट

होते. व्यापारी धान्य लपवून ठेवतात. तांदळाचे भाव सारखे चढतच असतात. शेवटी अनंगा आणि तिच्या मैत्रिणी रानात जाऊ लागतात. झाडांची कोवळी पाने तोडून ती जमा करू लागतात. सुरणाचे गड्डे शोधायला लागतात. हे त्यांना करावे लागते. कारण नाहीतर अन्नान्न दशा ठरलेलीच असते.

असे करीत असतानाच एके दिवशी रानात एक विद्रूप मनुष्य अनंगावर बलात्कार करण्याचा प्रयत्न करतो. पण त्याला बडवू काढण्यात येते.

हळूहळू परिस्थिती अधिकच बिघडू लागते. तांदूळ मिळविण्यासाठी अनंगाची शेजारीण छुटकी आपले शरीर विकते. अनंगाला आपल्या सोन्याच्या बांगड्या काढून द्याव्या लागतात आणि गंगाचरणला चौदा मैलावरील एका खेड्यात तांदळाच्या शोधासाठी जावे लागते.

परिस्थिती अधिकच बिघडते. आता रस्त्यावर भिकाऱ्यांचे थवे दिसू लागतात. त्यांना कोणी भिक्षाही घालीत नाही. एके दिवशी अनंगाला आपल्या घराजवळच तिच्या माहितीची एक अस्पृश्य मुलगी भुकेने मलूल होऊन पडलेली दिसते. तिला अनंगा अन्न आणि पाणी आणून देते. पण त्या मुलीत ते अन्न उचलण्याचेही त्राण नसते आणि अनंगाचे ब्राह्मण्यही अधिक प्रभावी ठरते. आणि ती मुलगी प्राण सोडते. त्या मुलीने प्राण सोडल्यावर तिच्याजवळ ठेवलेले अन्न भुकेलेली मुले घेऊन जातात. इथेच चित्रपट संपतो.

हा चित्रपट पाहताना प्रत्येक वेळी पथेर पांचालीची आठवण होत असते. पथेर पांचाली रानावनातून खळखळणाऱ्या झऱ्यासारखा आहे तर अशनि संकेत मधून मधून साचलेल्या छोट्या छोट्या डबक्यासारखा आहे. त्यात खेडेगावच्या जीवनाचा पट उलगडून ठेवला आहे पण तो आपल्याला कुठेच अंतर्मुख करू शकत नाही. या चित्रपटात रंगांचा काही कौशल्याने उपयोग केला आहे, पण या रंगसंगतीचा चित्रपटाच्या 'मूड'शी कुठेच मेळ बसत नाही. त्यामुळे कित्येकदा सर्वसामान्य पश्चिमी चित्रपटाइतकाच सामान्यपणे तिचा उपयोग केलेला आढळतो. या संपूर्ण चित्रपटासाठी इस्टमनकलर वापरण्याची आवश्यकता काय हे समजू शकत नाही.

हा संपूर्ण चित्रपट पहात असता एक विचार कायम मनात येत असतो की, या चित्रपटाच्या कथावस्तुकडे पाहण्याचा सत्यजित रायचा दृष्टीकोण काय? सत्यजित रायच्या चित्रपटात हा दृष्टीकोणाचा गोंधळ आपल्याला बऱ्याच वेळा दिसतो. अर्थात हे सर्व मान्य करूनही सत्यजितचे भारतीय चित्रपट सृष्टीतले स्थान अद्यापही अढळ आहे असे मानावे लागते. याचे कारण त्याची चित्रपटमाध्यमाची समज. या माध्यमाच्या समजाच्या अभावानेच मृणालसेनसारखा कलावंत प्रयोग करताना अडखळत असतो. आपल्या राजकीय विचारांना अनुरूप अशी चित्रपटसंकल्पना तो तयार करू शकत नाही.

या चित्रपटाला बर्लिन चित्रपट महोत्सवात 'गोल्डन बेअर' पारितोषिक मिळाले आहे. पण त्याला काही चित्रपटाच्या कलागुणवत्तेचे मोजमाप ठरवता येणार नाही. कारण पारितोषिक हे शेवटी पारितोषिक आहे. ◻ ◻ ◻

# अर्घ्य

महाभारत अभ्यासणाऱ्या अनेक मंडळींचा महारथी कर्ण हा एक सहानुभूतीचा विषय होऊन बसलेला आहे. राधेयावर झालेल्या अन्यायाने अनेक सहृदय मंडळी व्यथित झाली आहेत. महाभारतातील महापुरुष म्हणून कर्णाचा गौरव करण्यात आला आहे. सूर्यपुत्र कर्णावरील शिवाजी सावंत व रणजित देसाई यांच्या लिखाणास लोकमान्यता मिळाली आहे. तथापी कर्णाचे जीवन काव्यबद्ध करण्याचा पहिला प्रयत्न विजय कुवळेकर यांनी केला असून या आपल्या पहिल्याच प्रयत्नामध्ये त्यांनी लक्षणीय यश मिळवले आहे.

प्रसंगाची अचूक निवड, सुलभ शब्दरचना आणि काव्याची गेयता, या गोष्टींवर लक्ष केंद्रित करून श्री. कुवळेकर यांनी ही काव्यरचना केली आहे. नवीन विषय आणि सुलभ रचना या मुळे आकर्षित होऊन श्री. विश्वनाथ ओक यांनी कर्णावरील ही काव्यरचना स्वरबद्ध करण्याची जबाबदारी स्वीकारली असावी.

श्री. विजय कुवळेकर यांनी आपल्या या रचनेला अर्घ्य असे समर्पक नाव दिले आहे. गीतगायनाच्या कार्यक्रमाचाही त्याच नावाने उल्लेख करण्यात आला. पुणेकर रसिकासमोर ' अर्घ्य 'चा हा कार्यक्रम नुकताच सादर करण्यात आला. नवीन विषय व तुलनेने नवीन मंडळी असूनही कार्यक्रमाला चांगली दाद मिळाली. प्रत्यक्ष गायनामध्ये प्रामुख्याने सौ. विमल सोहनी व श्री. मनोहर चांदोरकर यांनी भाग घेतला होता. संगीतकार विश्वनाथ ओक यांच्या मार्गदर्शनाखाली या दोन्ही गायिकांनी बजावलेली कामगिरी निश्चितपणे समाधानकारक होती.

सुस्पष्ट शब्दोच्चार आणि काव्यामधील भाव लक्षात घेऊन गीत सादर करण्याची पद्धत दोन्ही गायकांनी अनुसरल्याचे जाणवले.

श्री. कुरळेकर यांच्या काही रचना विशेष लक्षात राहिल्या, त्या त्यांनी केलेल्या मार्मिक शब्दरचनेमुळे. स्वतःचा मुलगा समोर दिसत असूनही पुत्र म्हणून त्याचा उल्लेख करणेही शक्य नसणे, केलेल्या पराक्रमाचे कौतुक करण्याची उर्मी तशीच दाबून टाकणे अशी कर्णमाता कुंती हिची विचित्र मानसिक कोंडी झाली आहे. कुंतीच्या त्या वेळच्या भावना कुरळेकर शब्दबद्ध करतात——

हाच पुत्र तो
कसे कथावे
कोणाला आता,
सहन करावा
कसा दुरावा
पुत्राला बघता

ते पुढे म्हणतात——

सूर्यपुत्र तू
असून ' तेजा '
सूतपुत्र होशी,

ज्ञात तुला ना
तुझेच नाते
आहे कोणाशी !

--रचनेमध्ये नवखेपणा असला तरी सोप्या शब्दामध्ये अचूक भावना व्यक्त करण्याची कृप्ती कुरळेकर यांनी दाखवली आहे.

पांचालीवर मात्र आपल्या रचनेद्वारा कवीने अन्याय केला आहे असे वाटते. पांचालीला कर्णाबद्दल सुप्त आकर्षण होते असे गृहीत धरून त्यांनी एक रचना केली आहे. तसेच पाच पतींच्या पत्नीला 'पतिव्रता' कसे म्हणावे ? असा सवालही त्यांनी दुसऱ्या एका रचनेमध्ये केला आहे. त्यांच्या या रचना स्वररचनेमुळे चांगल्या ठरल्या असल्या तरी वैचारीक बैठक उथळ असल्याचे दाखवून देतात.

रणक्षेत्रावर कर्णाच्या रथाचे चाक भूमीत रूतून बसते. आणि हीच संधी आहे हे ओळखणारा श्रीकृष्ण अर्जुनाला बाण सोडण्याची आज्ञा देतो– हा प्रसंग महाभारतातील लोकप्रीय प्रसंग. अगदी बालगोपाळांनाही आवडणारा– कारण युद्धामध्ये आणि प्रेमामध्ये सर्वकाही चालते. आणि 'जशास तसे' या तत्वज्ञानाचा पुकारा या निर्णयामध्ये जरूर आढळतो. मृत्यू समोर दिसू लागल्यावर कर्णाला युद्धनीतीची आठवण होते. त्यावेळी श्रीकृष्ण कर्णाला विचारतो–

समोरी मृत्यू उभा दिसता
स्मरे का आता धर्म तुला.

या प्रसंगाभोवती गुंफलेले काव्य ही वेधक आहे. तसेच कर्णाच्या मृत्यूनंतर दुर्योधनाने वाहिलेले आसवांचे अर्घ्य ही कवीचे रचना कौशल्य दाखवून जाते.

महारथी कर्णाचे आयुष्य काव्यबद्ध करून रसिकासमोर ठेवण्याचा या तरुण कवीच्या उपक्रमाचे स्वागत करतानाच या रचना लोकांना समजतील त्यातील काव्यानंद त्यांना लुटता येईल अशा पद्धतीने त्या सादर करण्यामध्ये संगितकार विश्वनाथ ओक आणि त्यांचे सहकारी यांनी समाधानकारक कामगिरी बजावली आहे हे नमूद केले पाहिजे.

आज कला क्षेत्रातही प्रत्येक गोष्टीचा 'व्यापार' चालू असताना ज्या कार्यक्रमामध्ये फारसे 'व्यापारी सामर्थ्य' नाही असा एक वेगळा कार्यक्रम रसिकांसमोर सादर केल्याबद्दल कवी व संगितकार दोघांचेही अभिनंदन केले पाहिजे.

—शरद गोखले

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. PNC-68


# वडखळ नाका
# बॅरिस्टर अंतुले
# आणि
# गवयांची
# सत्यशोधन ( ! )
# समिती

□

या बनावामागील
सिद्धसाधकपणा
उघडकीस आणणारा
एक परखड लेख

□

## लेखक
## ॲडव्होकेट
## दत्ता पाटील
## अलिबाग

साप्ताहिक माणूस
पुढील अंकी